# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. महासभा सूचना क्रं. ८ दि. ०७११२०१३<br>मा. महासभा मंगळवार दि. १५।११।२०१३<br>सकाळी ११.०० वा. |
|---|---|

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : प्रकरण क्रं. ५० ते ५५ पर्यंत

प्रकरण बंद केल्याची तारीख : पुरक घोषणा क्र. ५६

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

(८)

१३/१४

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०७/११/२०१३.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०७, दिनांक ०७/११/२०१३.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________.

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. १९/११/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७, दि. ०७/११/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०७, दि. ०७/११/२०१३ सोबतची विषय पत्रिका**
**सभा मंगळवार दि. १९/११/२०१३**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ५० | दि. ११/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – निरंक |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ५१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत. |
| ५२ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ येथे क्रिडा संकुल विकसित करणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास व महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणे. |
| ५३ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| ५४ | राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापन करणेबाबत. (फेर सादर) |
| ५५ | महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव करणे व आर्थिक खर्चासाठी प्रशासकीय मंजूरी देणे. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०७ नोव्हेंबर २०१३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १९/११/२०१३ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **१८ श्री. मदन उदितनारायण सिंह मा. सदस्या यांनी दि. १८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| इ) महानगरपालिकेने टी.डी.आर. माध्यमाने मोबदला न देता आरक्षण ताब्यात घेतले पाहिजे होते. सदर आरक्षण ताब्यात न आल्यामुळे होत असलेल्या गैरसोयीसाठी जबाबदार कोण? |
| ई) वरील ३५६ आरक्षण महानगरपालिकेने विकसित करण्यापैकी अनेक आरक्षण ते ताब्यात घेतले नाही. सदर आरक्षण खाजगी मालकांकडून कुठलेही कर न भरता व्यक्तीशः / व्यावसायीक वापराकरीता वापरली जात आहे. नियमानुसार ते वापरु शकतात काय? |
| **१९ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. २९/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये श्रीम. रिटा मॉटारो ह्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामामुळे त्या लगत असलेल्या इमारतीतील रहिवाश्यांना त्रास व व्यत्यय होत असल्याने सदर अनधिकृत बांधकाम तोडण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि. व इतर रहिवाश्यांनी दि. ०८/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३ व दि. २८/०२/२०१३ रोजी मा. आयुक्त व मा. उपायुक्त (मु.) ह्यांना भेटून दिली आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास सदर निवेदनानुसार अद्याप पर्यत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) सदर इमारत अनधिकृत असल्याने ती तोडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२० श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारती संदर्भात महानगरपालिके विरुध्द दाखल केलेले सर्व दावे मा. न्यायालयाने फेटाळल्यानंतर मनपाच्या विधी अधिकारी यांनी सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावे असे निर्देश प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०३/२०१२ रोजी दिले आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास मनपाच्या विधी अधिकाऱ्यांच्या निर्देशनानुसार कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) निर्देशानुसार केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **२१ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारत झुकल्याने त्यापासून लगतच्या इमारतींना व त्यातील रहिवाश्यांना धोका निर्माण झाल्याने सदर झुकलेल्या इमारती व विकासका विरुध्द कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर ह्या गृहनिर्माण संस्थेने दि. ०७/१२/२०१२, दि. ०२/०१/२०१३ व लोकशाही दिन दि. ०४/०२/२०१३ व दि. ०७/०२/२०१३ मध्ये ठेवून ही अद्याप कारवाई झाली नाही हे खरे आहे काय? |
| अ) कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) त्या भागातील रहिवाश्यांना होणारा धोका दूर करण्या संदर्भात केव्हा कारवाई करणार? |
| **२२ सौ. तारा विनायक घरत मा. सदस्या यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| सद्याच्या प्रभाग क्र. १३ मध्ये असलेल्या विकास आराखड्यातील आरक्षणाबाबत.<br>१) मिरा भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात सद्या अस्तित्वात असलेल्या पालिका प्रभाग क्र. १३ च्या हद्दीत किती व कोणकोणती आरक्षणे आहेत? त्याचे क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक काय आहे? |
| अ) किती व कुठली आरक्षणे विकसीत झालेली आहेत? |
| ब) किती व कुठल्या आरक्षणांवर अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम झाले आहे? |
| क) आरक्षणातील कुठल्या अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम व बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई आजतागायत झाली आहे? |
| ड) किती व कोणती आरक्षणे किती टीडीआर देऊन घेतली आहेत? |
| इ) टीडीआर देऊन मिळालेली आरक्षणाची जागा पालिकेच्या ताब्यात आहे काय? का त्यावर अतिक्रमण झालेली आहेत? |
| **२३ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन मजली इमारत बांधली आहे. ती पाडणेसंदर्भात महापालिकेने केलेल्या कारवाईच्या विरोधात संबंधित मालकाने मा. न्यायालयात दावा क्र. |

| |
|---|
| स्पे.सीसुट १४/२०१२ व अपिल क्र.६१/२०१२ दाखल केले होते. ते दावा-अपिल फेटाळण्याने सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावी असे निर्देश महापालिका विधी अधिकारी ह्यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०६/२०१२ ने प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना दिले होते, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास ९ महिने कालावधी होऊनही अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) अनधिकृत इमारत पाडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२४ सौ. प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन माळ्यांची इमारत बांधल्याने त्या लगतच्या विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर गृहनिर्माण संस्था व इतर इमारतीतील फ्लॅट धारकांची हवा व उजेड बंद झाल्याने त्या त्रस्त झालेल्या फ्लॅटधारकांनी सदर अनधिकृत बांधलेली इमारत पाडण्यात यावी, अशी मागणी करणारी दि. १४/१२/२०१२, दि. ०२/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३, दि. २०/०२/२०१३, दि. २८/०२/२०१३ व २४/०३/२०१३ ची निवेदने मा. आयुक्त ह्यांना प्रत्यक्ष भेटून दिली आहेत, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, त्रस्त झालेल्या नागरीकांच्या निवेदनांवर अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२५ डॉ. रमेश धरमचंद जैन मा. सदस्य यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मोकळ्या जागेवरील कराची परिणामकारक वसुली होण्याच्या दृष्टीने कोणत्याही जमिन मालक / विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारीत बांधकाम मंजूरी, जोत्याचा दाखला, भोवगटा दाखला देण्यात येवू नये असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो. ह्यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मनपा/१४३/२००८-०९, दि. २२/१२/२००८ व आदेश क्र. मनपा/आयुक्त/२९४/२००९-१०, दि. २३/१२/२००९ ने नगररचना विभागास दिले होते हे खरे आहे का? |
| अ) असल्यास, दि. ०१/०४/२००८ ते दि. ३१/०३/२०१३ पर्यंत ह्या कालावधीमध्ये नगररचना विभागाने दिलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, ज्योत्याचा दाखला, भोगवटा दाखल ह्यांची तपशिलवार माहिती (मौजे, सर्व्हे क्र., विकासकाचे नाव, मंजुर बांधकाम क्षेत्र, मंजुरी आदेश / दिनांक व भरणा केलेल्या मोकळ्या जागेवरील कराची पावती क्र. व दिनांक) प्रत्येक वर्षवार मिळावी. |
| ब) मा. आयुक्त सो. ह्यांचे आदेश असताना मोकळ्या जागेवरील कराची पावती वसुली न केल्याने मनपाचे कोट्यावधी रुपयाचे आलेल्या नुकसानीस जबाबदार कोण आहे? |
| **२६ श्रीम. दिपिका पंकज अरोरा मा. सदस्या यांनी दि. १५/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) हमारे मिरा भाईंदर मे किटकनाशक छिडकाओ गाडी कितनी है? |
| अ) यह गाडी एक प्रभाग मे कितनी बार एक सप्ताह मे जानी चाहिए? |
| ब) अगर यह गाडी महिनों से खराब हो जाए तो हमारे पास दुसरी गाडी का बंदोबस्त है? |
| क) दुसरी गाडी न होने पर, क्या Alternative पध्दती है छिडकाओं की? |
| **२७ सौ. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. ०४/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. आयुक्त सो. तसेच सर्व विभागीय अधिकाऱ्यांना नगरसेवकांनी पाठविलेल्या तक्रारीबाबत तसेच कामाबाबतच्या पाठपुराव्या संदर्भात पत्रांची उत्तरे किती दिवसांत दिली जातात का? असल्यास किती दिवसात देणे अपेक्षित असते? |

# मा. महासभा

# दि. ११/०९/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. ११/०९/२०१३**

आज बुधवार दि. ११/०९/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ५ दि. ३०/०८/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १५) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १६) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १७) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १८) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २०) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २१) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २२) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २३) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २६) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २७) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २८) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २९) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३०) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३२) | शरद केशव पाटील | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| ३३) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३४) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३५) | डॉ. रमेश धरमचंद जैन | सदस्य |
| ३६) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३७) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३८) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३९) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४०) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४१) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४२) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४३) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४४) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४५) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४६) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ४७) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४८) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४९) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५०) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५१) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५२) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५३) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५४) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५५) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५७) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ५८) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५९) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६१) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६२) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६३) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६४) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ६५) | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | सदस्य |
| ६६) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६७) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ६८) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ६९) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७०) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७१) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७२) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७३) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७४) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| २) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ३) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ४) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| ५) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ६) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ७) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ८) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ९) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १०) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ११) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १२) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| १३) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| १४) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |

१५) भोईर भावना राजू सदस्या
१६) सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद सदस्या
१७) गावंड मंदाकिनी आत्माराम सदस्या

**रजेचा अर्ज –**
१) संदिप मोहन पाटील सदस्य
२) पाटील प्रणाली संदिप सदस्या

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत सर्व सन्मा. सदस्य, पत्रकार बंधु व शहरातील नागरीकांना गौरी गणपती सणानिमित्त हार्दिक शुभेच्छा. हा सण सर्व भाविकांना, शहरातील नागरीकांना सुखमय व आनंदी जावो ही शुभेच्छा सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडावी अशी माझी विनंती आहे. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ११/०९/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५, दि. ३०/०८/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवागीने बोलू इच्छितो. आज दिनांक ११/०९/२०१३ रोजीची सभा गणपती सणानिमित्त तहकुब करुन ३ ऑक्टोबर २०१३ रोजी लावण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत केळुस्कर :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. श्री. शरद पाटील साहेब, माझी तुम्हाला विनंती आहे की, आजची सभा आपण लवकरात लवकर संपवून गौरी गणपती सणाकरीता तयारी करु. हा ठराव तुम्ही मागे घेतला तर बरे होईल. मॅडम, आजची ही सभा सुरु राहू द्या असा मी ठराव मांडतो.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब मतदान घ्या दोन ठराव आलेले आहेत आणि कृपया दरवाजे बंद करा.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब जरा नियम सांगा म्हणजे आत्ता ठराव लिहून येईपर्यंत आपण थांबणार?

**नगरसचिव :-**

दोन्ही ठराव वाचावे लागतात आपण प्रत्येक वेळी थांबतो.

**वर्षा भानुशाली :-**

दरवाजा बंद करा.

**नगरसचिव :-**

प्रक्रिया सुरु झाल्यावर बंद केला जाईल.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी ठराव मागे घेतलेला आहे. त्यांचे अभिनंदन आणि आभारही व्यक्त करतो तर सभा तहकुब करावी अशी आमची विनंती आहे.

**मा. महापौर :-**

आजपर्यंत आपण तारीख दिली नव्हती.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, प्रोसिजरप्रमाणे तारीख आणि वेळ ठरवावी लागते. सचिव साहेब चांगले सांगतील आणि सभागृहाने हे ठरवलेले आहे मी ठरवत नाही सभागृह ठरवते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब सभागृहाने ही मिटींग तहकुब करायची असे ठरवलेले आहे पण जी तारीख आणि वेळ आहे ती नंतर डिक्लेअर करा.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृह ठरवते.

**मा. महापौर :-**

*तारीख कधी दिली नव्हती आपण सभा तहकुब करतो एवढेच बोलायचे.*

**जुबेर इनामदार :-**

सभा बोलवायचा अधिकार मा. महापौरांचा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्या माहितीसाठी सांगतो की, हा सभागृहाचा अधिकार आहे की, सभा कधीपर्यंत तहकुब करायची हा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे सचिव साहेब, आपण पूर्ण माहिती द्या.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, माहिती द्या मागणी करायचा अधिकार सभागृहाचा आहे परत सभा कधी लावायची तो अधिकार मा. महापौरांचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, त्यांनी सांगितले की, ही सभा तहकुब करा आणि या रोजी घ्या पण आम्ही ती डेट ॲक्सेप्ट करत नाही आम्ही हे ॲक्सेप्ट करतो की, गौरी गणपतीचा सण आहे, ही सभा तहकुब करा परंतु आम्ही तीन तारीख ॲक्सेप्ट करत नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम विनंती आहे की गणपती विसर्जनानंतरच परत सभा बोलवा ते डेट देऊ शकत नाहीत तसा सभाशास्त्र नियम नाही ते फक्त सभा तहकुब करण्याची मागणी करु शकतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण सभा तहकुब करु परंतु जी डेट आहे ती आपण नंतर डिसाईड करु आणि जर तुम्हाला पाहिजे असेल तर आत्ता डिसाईड करु.

**मा. महापौर :-**

आजची सभा आपण तहकुब करीत आहोत सुचक श्री. शरद केशव पाटील आणि अनुमोदन श्री. प्रशांत केळुसकर यांचा आलेला जो ठराव आहे तो मी स्विकारत आहे आणि आजची सभा तहकुब करत आहे पुढच्या सभेची वेळ मी देईन.

**सभा तहकुबी ठराव क्र. २८ :-**

आज दि. ११/०९/२०१३ रोजीची सभा गणपती सणानिमित्त तहकुब करुन दि. ३ ऑक्टोबर २०१३ रोजी लावण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद केशव पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

**सदर ठरावामध्ये मा. महापौर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

*तहकुब सभा लावण्यासाठी दिनांक व वेळ मी देईन व त्याप्रमाणे तहकुब सभा लावण्यात यावी.*

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

सही/-
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ - सकाळी ११.४१ वा.**

सही/-
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा दि. २१/०९/२०१३

(दि. ११/०९/२०१३ रोजीची

तहकुब सभा) रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह**

**मा महासभा दि. २१/०९/२०१३**

आज शनिवार दि. २१/०९/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब मा. महासभा सकाळी ११.३० वाजता सभा सुचना क्र. ६ दि. ३०/०८/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १४) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १५) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १६) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १७) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १८) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १९) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २०) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २१) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २२) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २३) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २४) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २५) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २६) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २७) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २८) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २९) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| ३०) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३१) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३२) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३३) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३५) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३६) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३७) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३८) | शरद केशव पाटील | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| ३९) | जैन गिता भरत | सदस्या |
| ४०) | डॉ. रमेश धरमचंद जैन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४१) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४२) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४३) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४४) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४५) | ग्रिटा स्टिफन् फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४६) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४७) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४८) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ५०) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ५१) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५२) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५३) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५४) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५७) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५८) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५९) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६०) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६१) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६२) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६५) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६६) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६८) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६९) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७०) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७१) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७२) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७३) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७४) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७५) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७६) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७७) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७८) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७९) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८०) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८२) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८३) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८४) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८५) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८६) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८८) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| २) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४) | लियाकत ग. शेख | सदस्य |

५) पाटील प्रणाली संदिप — सदस्या
६) शेख शबनम लियाकत — सदस्या
७) प्रभाकर पद्माकर म्हात्रे — सदस्य
८) धनेश परशुराम पाटील — नामनिर्देशित सदस्य

**रजेचा अर्ज –**

१) सुजाता रविकांत शिंदे — सदस्या

**मा. महापौर :-**

दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब मा. महासभा आज आयोजित करण्यांत आलेली आहे. सभेस उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत. सर्व सन्मा. सदस्य, पत्रकार बंधू व शहरातील नागरिकांना येणाऱ्या नवरात्री उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. सचिवांनी सभेस सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा बुधवार दि. ११/०९/२०१३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील विषय क्र. २८ ते ३७ व पुरक घोषणा क्र. ३८ ते ३९ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा शनिवार, दिनांक २१/०९/२०१३ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर, ११ तारखेला जी मा. महासभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी सर्वानुमते ठराव झाला होता. आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने सभा तहकुब करण्यात आली होती. आणि ३ ऑक्टोबरला लावा असे ठरावात नमुद आहे आणि त्याप्रमाणे सभा तहकुब झाली. आम्हाला या ठिकाणी परत आज पत्र प्राप्त झालेले आहे की, २१ तारखेला ही सभा आयोजित केलेली आहे. आणि पत्राच्या खाली लिहिलेले आहे की, मा. महापौर सो. यांच्या आदेशाने. तर सचिवांनी थोडासा खुलासा केला तर ही सभा शांततेने, खेळीमेळीने पार पाडता येईल. जनरली आपला अजेंडा असतो त्यावर असे म्हटलेले नसते की, मा. महापौरांच्या आदेशाने. म्हणजे जे सभाशास्त्र कामकाज नियम आहेत, त्याप्रमाणे सभेचे कामकाज होत असते आणि आम्हाला आपण परिपत्रक किंवा पत्र पाठवत असता. आज आपण स्पेसिफिक, मा. महापौरांच्या आदेशाने असे म्हटले आहे, त्याचा आपण खुलासा करावा.

**नगरसचिव :-**

दि. ११/०९/२०१३ ची मा. महासभा तहकुब झाली त्यावेळी सभा ३ ऑक्टोबर २०१३ रोजी लावण्यात यावी असा ठराव होता. त्यावेळी मा. महापौरांनी सुचना केली की, मी वेळ ठरवेन. त्याप्रमाणे मा. महापौरांकडे मी प्रत्यक्ष जाऊन त्यांच्याशी विचारविनिमय केला की, असा-असा ठराव झालेला होता. याच्यासाठी आपली सुचना काय आहे. तर मा. महापौर म्हणाल्या की, मी तुम्हाला आदेश देते. तुम्ही माझ्या आदेशाप्रमाणे, वेळ ठरविण्याचा अधिकार माझा आहे. त्याप्रमाणे मी तुम्हाला आदेश देते. त्याप्रमाणे सभा दि. २१/०९/२०१३ रोजी लावावी असा आदेश मला दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे याचा असा अर्थ आहे की, ही जी सभा आयोजित केलेली आहे, ती आपण नाही. मा. महापौरांनी आदेश दिले म्हणून आपण लावलेली आहे. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, नक्की आपले मत नाही की, सभा आयोजित करण्यांत यावी. मा. महापौर मॅडम, सभाशास्त्र कामकाज नियम महानगरपालिकेने तयार केलेले आहे. तर मला सचिवांनी एक सांगा की, सभाशास्त्र कामकाज नियम महत्वाचे की, मा. महापौरांचे आदेश? म्हणजे जे कामकाज चालते ते सभाशास्त्र कामकाज नियमाप्रमाणे चालणार की, मा. महापौरांनी सांगितल्याप्रमाणे चालणार?

**नगरसचिव :-**

सभा कामकाजाप्रमाणेच सभा चालते.

**नरेंद्र मेहता :-**

मग या सभेमध्ये आपण सभाशास्त्र कामकाज वाचलेच असेल. तरीही मी आपल्याला सांगतो. त्या सभेमध्ये सभा तहकुब करायची हे पालिका सदस्यांनी ठरवायचे आहे. मा. महापौरांनी नाही. मा. महापौर मॅडम, आपल्या माहितीसाठी, इकडे सर्व राष्ट्रवादी आणि कॉंग्रेसचे जुने नगरसेवक सुध्दा आहेत. मागच्या वेळी सभागृहात भांडण झाले होते त्यावेळी सभागृहामध्ये मी मा. महापौर असताना आजची सभा तहकुब करण्यांत येत आहे असे जाहिर करुन मी निघालो होतो. त्यावेळी सभागृहाने आक्षेप घेतलेला की, हा अधिकार मा. महापौरांचा नाही, सभागृहाचा आहे आणि सभागृहाने त्यावेळी श्री. जयंत पाटील यांना मा. पिठासीन अधिकारी

म्हणून बसवले आणि या सभेचे कामकाज पुढे चालू झाले. आता आपण हे "म" मध्ये बघा. याच्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, कोणतीही सभा उपस्थित असलेल्या बहुसंख्य पालिका, सदस्यांच्या संमतीने वेळोवेळी त्या दिवशी नंतरच्या वेळेपर्यंत किंवा अन्य कोणत्याही दिवसापर्यंत, म्हणजे ॲनी डेट, ॲनी वार, ॲनी महिना, तहकुब करता येईल. आणि त्याप्रमाणे ठराव केलेला आहे. आता आपण जे मगाशी सांगितले की, मा. महापौरांनी सुचना केली. अशी सुचना चालत नाही. मा. महापौरांना ठरावामध्ये कुठलाही शब्द ॲडिशन किंवा डिलीशन करता येत नाही. खालून ठराव आलेला आहे. एखाद्या सत्ताधाऱ्यांना वाटले तर त्यांनी वेगळा ठराव मांडून केले असते. पण जो ठराव मंजुर झाला. आपण आम्हाला जी सत्यप्रत दिली आहे, त्यामध्ये आजही तुमच्याकडून कोणी ठराव मागितला की, तहकुब कशी झाली, तर आपण तोच ठराव देणार, तीन ऑक्टोबर पर्यंत. त्याच्यामध्ये पण शब्दाचा समाविष्ट नाही. मग मला एक सांगा की, आजची सभा ही सभागृहाने ठरवले की, तीन तारखेपर्यंत तहकुब आहे. आज कशी लावता येईल?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी मला तसा लेखी आदेश दिला. मी मा. महापौरांच्या आदेशाचे वाचन केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण आपले मत मा. महापौरांना दिले नाही का?

**नगरसचिव :-**

मी मा. महापौरांसोबत चर्चा केली. सभाशास्त्र कामकाजाबाबत दोन्ही गोष्टींचा उहापोह करुन मा. महापौरांशी चर्चा केलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी सचिवांना विचारले. सचिवांनी खुलासा केलेला आहे. आता परत आर्ग्युमेंट करण्याचा मतलब नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, मिटींग सुरु करा.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. सभागृह नेता, आमचा आग्रह असतो की, सभा लावावी. जास्तीत जास्त काम होईल. या महापालिकेमध्ये एक उदाहरण आहे. मागच्या वेळी असेच झालेले सभा तहकुब झालेली. नंतर श्री. तुळशिदास म्हात्रे यांनी सभा चालवली. नंतर स्थगिती आली आणि सहा महिने मा. महासभा झाली नाही. पूर्ण शहराचे वाटोळे झालेले आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य हाऊस को गुमराह कर रहे है। वो जिस मिटींग का हवाला दे रहे है, उस मिटींग में तहकुब होने के बाद उस मिटींग को कंटीन्यु चलाया गया था। इसके लिए उस मिटींग को अवैध ठराया गया था। अब सभा कामकाज नियम का हवाला दे रहे है। सभा कामकाज नियम के अंदर स्पष्ट लिखा हुआ है, अन्य प्रत्येक बाबीत सभेचा दिवस, वेळ व ठिकाण महापौराने ठरविले पाहिजे. उसी के आदेश अनुसार यह सभा हुयी है। मेरा आपसे निवेदन है की, सभा का कामकाज शुरु करने के लिए सचिव साहब को आदेश दिजिए।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम असे नाही. श्री. भगवती शर्माजी आपल्याला आठवण करुन देतो. त्या सभेमध्ये आपण एकत्र तो ठराव केला होता. तुमचे अनुमोदन होते. त्यामध्ये बेकायदेशीर का ठरली त्याचे कारण सांगतो. कारण त्या सभेच्या ठरावामध्ये आम्ही म्हटले होते की, अमुक तारखेपर्यंत ही सभा तहकुब करण्यात येत आहे. आम्ही गेल्यानंतर ताबडतोब त्या तारखेचे पालन न करता सभा लावली म्हणून ती स्थगिती झाली होती. आणि सहा महिने झाली नाही. आज तुम्हाला काय करायचे ते तुम्ही करा. पण मला सचिवांनी एक खुलासा करा की, ही सभा कायदेशीर की बेकायदेशीर?

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहताजी खरोखर सभागृहाची दिशाभूल करत आहेत. तेव्हा तसे काहीच घडले नव्हते. मा. महापौर श्री. तुळशिदास म्हात्रे सभागृहामध्ये आले होते. त्याचवेळी मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी सभा तहकुब करण्याची मंजुरी दिलेली होती असे काही घडले नव्हते.

**शरद पाटील :-**

श्री. जुबेर इनामदार साहेब, आपल्याला माहिती नसेल की, तुम्ही ती सभा चालवली.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही सभा चालवली कारण तेव्हा आमचे मा. महापौर आले.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

श्री. जुबेर इनामदार, तुम्ही बसा. सभा सुरु करा.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, अशी सभा चालणार नाही. आम्हाला कायद्याचे पालन सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, काय दुसरा प्रश्न आणि तिसरा प्रश्न? हे काय लावले आहे?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या आदेशानुसार करतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तिसरा प्रश्न घ्या.

**निलम ढवण :-**

सचिव साहेब, विधी मॅडमना बोलावून त्याच्यावर निर्णय घ्या.

**नगरसचिव :-**

तिसरा प्रश्न श्रीम. गिता भरत जैन यांचाच आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव कसा पास झाला आहे?

**नगरसचिव :-**

सर्वानुमते.

**नरेंद्र मेहता :-**

सर्वानुमतेचा मिनिंग काय आहे?

**नगरसचिव :-**

मी तसे कळवले. चर्चा केली. मा. महापौरांना कळवले हाते.

(सभागृहात गोंधळ)

**प्रेमनाथ पाटील :-**

विधी विभागाला विचारा की, मिटींग योग्य आहे की, अयोग्य आहे?

**मा. महापौर :-**

लक्षवेधी घ्या.

**नगरसचिव :-**

पाचवा प्रश्न श्री. नरेंद्र मेहता यांचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे सभागृहाचे कामकाज विधीवत होणार नाही. बेकायदेशीर होईल. याची शहराला मोठी किंमत मोजावी लागेल. तुम्ही याचा विचार करायला पाहिजे.

**प्रशांत दळवी :-**

विधी मॅडम, आपला याच्यामध्ये सल्ला द्या. आपले मत मांडा.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरिता दोन लक्षवेधी आलेल्या आहेत.

**नगरसचिव :-**

श्री. नरेंद्र मेहता यांचे प्रश्न आहेत. श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील यांचे दोन प्रश्न आहेत. श्री. लियाकत शेख यांचा प्रश्न आहे.

(सभागृहात गोंधळ)

**राजेंद्र जैन :-**

सचिव साहेब, आप यह मान रहे हो की, सभाशास्त्र नियम के उपर आप मा. महापौर ...............

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरिता दोन लक्षेवधी आलेल्या आहेत.

**नगरसचिव :-**

मैंने मेरी ड्यूटी की है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरिता दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. एक सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार व दुसरी सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहता. मी सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांची लक्षवेधी स्विकारत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

विषय सुरु करा.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८, दि. १६/०५/२०१३ व दि. ०५/०६/२०१३ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. १६/०५/२०१३ व दि. ०५/०६/२०१३ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावास माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौरांचा आदेश असो, पण सभाशास्त्र नियमाप्रमाणे त्यांनी सभा लावायला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आजची सभा आम्ही मांडलेल्या ठरावाच्या अनुषंगाने लावलेली नाही. सचिवांनी आपल्या आदेशाचे पालन केले असेल तरी त्यांनी सभाशास्त्र कामकाज नियमात सभा बोलावली पाहिजे होती. ती झाली नाही असे आम्हाला एकंदरीत वाटते. आज जी सभा होणार आहे ती पूर्णपणे बेकायदेशीररित्या आयोजित करण्यात आलेली आहे आणि ह्या बेकायदेशीर सभेमध्ये आम्ही भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या सभेत भागीदार होणार नाही. त्यामुळे ह्या सभेचा त्याग करतो आणि सचिवांनी ३ ऑक्टोंबरला ही सभा आयोजित करण्यात यावी अशी विनंती.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण सभा चालू ठेवा.

**प्रकरण क्र. २८ :-**

दि. १६/०५/२०१३ व दि. ०५/०६/२०१३ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २९ :-**

दि. १६/०५/२०१३ व दि. ०५/०६/२०१३ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २९, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रुग्णालय हस्तांतरण शासनास करण्यासाठी वाढीव खर्चास संमती दर्शविणे बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दाखल जनहित याचिका क्र. ३८/२००६ च्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे भाईंदर (प.) येथे २०० खाटांचे रुग्णालय बांधण्यात आले आहे. सदर रुग्णालय स्थापित करुन ते चालविण्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग नेमणे व उपकरणे, यंत्र सामुग्री, फर्निचर व इतर आवश्यक बाबी पाहता महानगरपालिकेवर खूप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.

सदर बाब लक्षात घेऊन मा. महासभेने दि. १४/१२/२०१२ रोजी ठराव क्र. १२ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे महानगरपालिकेच्या वतीने जनहित याचिका क्र. ३८/२००६ यात Civil Application No. १६६/२०१३ दाखल करून टेंबा रूग्णालय महानगरपालिका ऐवजी राज्य शासन अथवा सेवाभावी संस्था, धर्मादाय संस्था यांना चालविण्यासाठी परवानगी अपेक्षिलेली आहे. सदरचा अर्ज मा. उच्च न्यायालया समोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनास टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत विनंती केली होती. त्या विनंतीच्या अनुषंगाने मा. अप्पर मुख्य सचिव यांच्या निर्देशानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांच्यासह भाईंदर येथे येऊन रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी केली व शासनाकडे अहवाल पाठविला आहे.

मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजितदादा पवार यांच्याकडे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग, मा. पालकमंत्री, श्री. गणेश नाईक, मा. राज्यमंत्री श्री. उदय सावंत, मा. खासदार श्री. संजीव नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन, मा. महापौर श्रीम. कॅटलिन परेरा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ हुसेन व इतर पदाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त व इतर अधिकारी यांच्या उपस्थितीत टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत दि. २०/०८/२०१३ रोजी बैठक झाली होती. त्यानुसार व राज्य

शासनाच्या क्रमांक मिभारु२०१३/प्र.क्र.२३५/आरोग्य-३अ/नवि-२८ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दि. १०.०९.२०१३ च्या पत्रानुसार ही महासभा खालील प्रमाणे ठराव करत आहे.

१. टेंबा रूग्णालय इमारत कोणत्याही मोबदल्याशिवाय महानगरपालिका शासनाकडे हस्तांतरित करण्यास तयार आहे.

२. सदर इमारतीत शासकीय यंत्रणेने काही फेरफार सुचविल्यास अंतर्गत सजावट करण्यास रु. २ ते ३ कोटी खर्च महानगरपालिका देण्यास तयार आहे.

३. रूग्णालयासाठी लागणारी यंत्रसामुग्री/साधनसामुग्री ही शासनाने त्यांच्या यंत्रणेमार्फत खरेदी करावी. यासाठी येणारा खर्च रु. ५ कोटी महानगरपालिका देण्यास तयार आहे.

४. सदर २०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित झाल्यानंतर भविष्यात शासनाने येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कार्यरत करावयाचे ठरविल्यास सदर जागेत अस्तित्वात असलेल्या तळमजला अधिक चार मजले येथे अधिक तीन मजले बांधण्याचा खर्च महानगरपालिका उचलण्यास तयार आहे.

तसेच टेंबा रुग्णालय शासनास हस्तांतरण करण्यासंदर्भात भविष्यात शासनाशी बोलणी करतेवेळी आवश्यकतेनुसार काही निर्णय घ्यावयाचे झाल्यास, मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्याशी चर्चा करुन असे निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास, ही महासभा मंजुरी देत आहे.

**मा. महापौर :-**

विषय दोन चालू झाले तेव्हा भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या लोकांनी सभा सोडलेली आहे.

**सुहास रकवी :-**

ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावात सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रूग्णालय शासनास हस्तांतरणाचा प्रस्ताव दि. १०/९/२०१३ जा.क्र.मिभारु/२०१३/प्र.क्र./२३५/आरोग्य-३अ/नवि-२८, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई ह्यांनी सुचविल्याप्रमाणे हस्तांतर बाबींचा ठराव शासनास सादर केल्यानंतर राज्य शासनाच्या माध्यमातून रुग्णालय सुरु होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने मिरारोडमध्ये महापालिकेचे सद्यस्थितीत कार्यान्वित असलेले स्व. इंदिरा गांधी रुग्णालयाच्या धर्तीवर टेंभा रुग्णालय इमारतीमध्ये ओ.पी.डी., डायलॅसीस केंद्र व शक्य तेवढे वैद्यकिय विभाग सुरु करावे आणि लागणारे वैद्यकिय कर्मचारी ठोक मानधनावर घ्यावेत व सदर विषयी आर्थिक व प्रशासकीय कामाची पुर्तता करणेकामी मा. आयुक्त साहेबांना आधिकार देण्यात यावेत अशी मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे. मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्यासोबत चर्चा करुन मा. आयुक्तांनी अधिकार वापरावेत.

**बर्नड डिमेलो :-**

ह्या सुचनेला माझे अनुमोदन आहे. मा. आयुक्त, मा. महापौर आणि मा. उपमहापौर ह्यांना अधिकार देण्यात यावेत.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, प्रश्नोत्तरासाठी आम्हाला वेळ दिला असता तर आम्हाला बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

मॅडम, मी शेवटी वेळ देते. आता ठराव चालले आहेत. सुचनेसह ठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. २९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रुग्णालय हस्तांतरण शासनास करण्यासाठी वाढीव खर्चास संमती दर्शविणे बाबत.

**ठराव क्र. ३० :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दाखल जनहित याचिका क्र. ३८/२००६ च्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे भाईंदर (प.) येथे २०० खाटांचे रुग्णालय बांधण्यात आले आहे. सदर रुग्णालय स्थापित करुन ते चालविण्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग नेमणे व उपकरणे, यंत्र सामुग्री, फर्निचर व इतर आवश्यक बाबी पाहता महानगरपालिकेवर खूप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.

सदर बाब लक्षात घेऊन मा. महासभेने दि. १४/१२/२०१२ रोजी ठराव क्र. १२ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे महानगरपालिकेच्या वतीने जनहित याचिका क्र. ३८/२००६ यात Civil Application No. १६६/२०१३ दाखल करून टेंबा रूग्णालय महानगरपालिका ऐवजी राज्य शासन अथवा सेवाभावी संस्था, धर्मादाय संस्था यांना चालविण्यासाठी परवानगी अपेक्षिलेली आहे. सदरचा अर्ज मा. उच्च न्यायालया समोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनास टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत विनंती केली होती. त्या विनंतीच्या अनुषंगाने मा. अप्पर मुख्य सचिव यांच्या निर्देशानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांच्यासह भाईंदर येथे येऊन रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी केली व शासनाकडे अहवाल पाठविला आहे.

मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजितदादा पवार यांच्याकडे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग, मा. पालकमंत्री, श्री. गणेश नाईक, मा. राज्यमंत्री श्री. उदय सावंत, मा. खासदार श्री. संजीव नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन, मा. महापौर श्रीम. कॅटलिन परेरा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ हुसेन व इतर पदाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त व इतर अधिकारी यांच्या उपस्थितीत टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत दि. २०/०८/२०१३ रोजी बैठक झाली होती. त्यानुसार व राज्य शासनाच्या क्रमांक मिभारु२०१३/प्र.क्र.२३५/आरोग्य-३अ/नवि-२८ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दि. १०.०९.२०१३ च्या पत्रानुसार ही महासभा खालील प्रमाणे ठराव करत आहे.

१. टेंबा रूग्णालय इमारत कोणत्याही मोबदल्याशिवाय महानगरपालिका शासनाकडे हस्तांतरित करण्यास तयार आहे.

२. सदर इमारतीत शासकीय यंत्रणेने काही फेरफार सुचविल्यास अंतर्गत सजावट करण्यास रु. २ ते ३ कोटी खर्च महानगरपालिका देण्यास तयार आहे.

३. रूग्णालयासाठी लागणारी यंत्रसामुग्री/साधनसामुग्री ही शासनाने त्यांच्या यंत्रणेमार्फत खरेदी करावी. यासाठी येणारा खर्च रु. ५ कोटी महानगरपालिका देण्यास तयार आहे.

४. सदर २०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित झाल्यानंतर भविष्यात शासनाने येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कार्यरत करावयाचे ठरविल्यास सदर जागेत अस्तित्वात असलेल्या तळमजला अधिक चार मजले येथे अधिक तीन मजले बांधण्याचा खर्च महानगरपालिका उचलण्यास तयार आहे.

तसेच टेंबा रुग्णालय शासनास हस्तांतरण करण्यासंदर्भात भविष्यात शासनाशी बोलणी करतेवेळी आवश्यकतेनुसार काही निर्णय घ्यावयाचे झाल्यास, मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्याशी चर्चा करुन असे निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास, ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. सुहास रकवी**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार व अनुमोदक श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रूग्णालय शासनास हस्तांतरणाचा प्रस्ताव दि. १०/९/२०१३ जा.क्र.मिभारु/२०१३/प्र.क्र./२३५/आरोग्य-३अ/नवि-२८, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई ह्यांनी सुचविल्याप्रमाणे हस्तांतर बाबींचा ठराव शासनास सादर केल्यानंतर राज्य शासनाच्या माध्यमातून रुग्णालय सुरु होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने मिरारोडमध्ये महापालिकेचे सद्यस्थितीत कार्यान्वित असलेले स्व. इंदिरा गांधी रुग्णालयाच्या धर्तीवर टेंभा रुग्णालय इमारतीमध्ये ओ.पी.डी., डायलॅसीस केंद्र व शक्य तेवढे वैद्यकिय विभाग सुरु करावे आणि लागणारे वैद्यकिय कर्मचारी ठोक मानधनावर घ्यावेत व सदर विषयी आर्थिक व प्रशासकीय कामाची पुर्तता करणेकामी मा. आयुक्त साहेबांना अधिकार देण्यात यावेत अशी मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे. मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्यासोबत चर्चा करुन मा. आयुक्तांनी अधिकार वापरावेत.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३०, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील स्मशानभूमीत सी.एन.जी. शवदाहिनी बसविणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १४ स्मशानभूमी आहेत. त्यापैकी भाईंदर (प.) स्मशानभूमीत सीएनजी शवदाहीनी बसविण्यात आलेली असून कार्यान्वीत केलेली आहे. पर्यावरणाच्या तसेच दहन प्रक्रिया जलदगतीने व्हावे या दृष्टीने शहरात सीएनजी शवदाहीन्या बसविण्याची मागणी होत असते. खालील उल्लेखल्याप्रमाणे स्मशानभूमीत सीएनजी शवदाहीनी बसविण्याची प्रस्तावित आहे.

१) भाईंदर (पूर्व) बंदरवाडी येथील स्मशानभूमी
२) काशिमिरा येथील स्मशानभूमी
३) पेणकरपाडा येथील स्मशानभूमी
४) मिरा रोड येथील स्मशानभूमी

वरील चारही स्मशानभूमीत दहन संख्या जास्त प्रमाणात आहे. तरी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे व भविष्यात दरवर्षी टप्प्याटप्प्याने सीएनजी शवदाहीन्या बसवाव्यात असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमीत सी.एन.जी. शवदाहिनी बसविणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १४ स्मशानभूमी आहेत. त्यापैकी भाईंदर (प.) स्मशानभूमीत सीएनजी शवदाहीनी बसविण्यात आलेली असून कार्यान्वीत केलेली आहे. पर्यावरणाच्या तसेच दहन प्रक्रिया जलदगतीने व्हावे या दृष्टीने शहरात सीएनजी शवदाहीन्या बसविण्याची मागणी होत असते. खालील उल्लेखल्याप्रमाणे स्मशानभूमीत सीएनजी शवदाहीनी बसविण्याची प्रस्तावित आहे.

१) भाईंदर (पूर्व) बंदरवाडी येथील स्मशानभूमी

२) काशिमिरा येथील स्मशानभूमी

३) पेणकरपाडा येथील स्मशानभूमी

४) मिरा रोड येथील स्मशानभूमी

वरील चारही स्मशानभूमीत दहन संख्या जास्त प्रमाणात आहे. तरी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे व भविष्यात दरवर्षी टप्प्याटप्प्याने सीएनजी शवदाहीन्या बसवाव्यात असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३१, मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागास आवश्यकतेनुसार संगणक पुरविण्यात आलेले आहेत. या विभागापैकी बऱ्याच विभागासाठी संगणकीय आज्ञावल्या तयार करण्यात आलेल्या आहेत. या संगणकांचा व आज्ञावल्यांचा परिणामकारक उपयोग व्हावा म्हणून आवश्यक असलेले संगणक चालक, या सोबत मा. महासभा, स्थायी समितीसभा व अन्य समित्यांची इतिवृत्तांते तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने, मा. महासभा दि. २०/०६/२००६ ठराव क्र. २९, नुसार संगणक चालक व लघुलेखक महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर प्रथम नेमणुकी करण्यात आलेल्या असून त्यांना वेळोवेळी मा. महासभेच्या मान्यतेने मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. मा. महासभा दि. २०/०३/२०१० ठराव क्र. ६५, अन्वये संगणक चालक व लघुलेखक यांचे नियुक्ती मुदतवाढीस मंजुरी देताना संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास पाठविण्यात मान्यता दिली. शासनाकडे प्रस्ताव मंजुरी करीता पाठविला असता दि. २९/०९/२००६ चे शासनाकडील पत्रानुसार सदर प्रस्ताव अमान्य केला व संगणक चालकांचे काम मंजूर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यामार्फत किंवा बाह्यमार्गाने (Through Out sourcing) करुन घेणे अपेक्षीत आहे असे कळविले आहे.

मा. महासभा दि. १४/१२/२०१२, दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा ठराव क्र. २२ अन्वये दि. ०१/१०/२०१२ पासुन ७५ संगणक चालक व ०३ लघुलेखक यांना पुढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली असुन मार्च-२०१३ पर्यंत संगणक चालक यांना रु. ६,५००/- व लघुलेखक यांना रु.७,५००/- इतके मासिक मानधन देण्यात येत होते. माहे एप्रिल-२०१३ पासून संगणक चालक यांना रु. ९,५००/- व लघुलेखक यांना रु. १०,५००/- इतके वाढीव मासिक मानधन देणेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सदरच्या नेमणूकींची मुदत दि. ३०/०८/२०१३ रोजी संपत आहे.

सद्यस्थितीत महापालिकेच्या विविध विभागात ७५ संगणक चालक कार्यरत असून ०३ लघुलेखक सचिव विभागात कार्यरत आहेत. यापैकी जे संगणक चालक नियमितपणे उपस्थित राहुन आवश्यक सेवा बजावतात, त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेस सेवा देतांना कर्तव्यपरायणता व शिस्त न पाळणाऱ्या संगणक चालकांना मुदतवाढ न देता त्यांच्या सेवा खंडीत करणे उचीत ठरेल.

महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये रु. ९५.०० लाख इतकी तरतुद करणेत आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाचा बोजा पाहता संगणक चालक तसेच लघुलेखक यांची मुदत दि. ३०/०८/२०१३ रोजी संपत असल्याने संगणक चालक व लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सध्याच्या मानधनावर एक वर्षाची मुदतवाढ देणेस ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३१ :-**

मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.

**ठराव क्र. ३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागास आवश्यकतेनुसार संगणक पुरविण्यात आलेले आहेत. या विभागापैकी बऱ्याच विभागासाठी संगणकीय आज्ञावल्या तयार करण्यात आलेल्या आहेत. या संगणकांचा व आज्ञावल्यांचा परिणामकारक उपयोग व्हावा म्हणून आवश्यक असलेले संगणक चालक, या सोबत मा. महासभा, स्थायी समितीसभा व अन्य समित्यांची इतिवृत्तांते तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने, मा. महासभा दि. २०/०६/२००६ ठराव क्र. २९, नुसार संगणक चालक व लघुलेखक महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर प्रथम नेमणुकी करण्यात आलेल्या असून त्यांना वेळोवेळी मा. महासभेच्या मान्यतेने मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. मा. महासभा दि. २०/०३/२०१० ठराव क्र. ६५, अन्वये संगणक चालक व लघुलेखक यांचे नियुक्ती मुदतवाढीस मंजुरी देताना संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास पाठविण्यात मान्यता दिली. शासनाकडे प्रस्ताव मंजुरी करीता पाठविला असता दि. २९/०९/२००६ चे शासनाकडील पत्रानुसार सदर प्रस्ताव अमान्य केला व संगणक चालकांचे काम मंजूर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यामार्फत किंवा बाह्यमार्गाने (Through Out sourcing) करुन घेणे अपेक्षीत आहे असे कळविले आहे.

मा. महासभा दि. १४/१२/२०१२, दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा ठराव क्र. २२ अन्वये दि. ०१/१०/२०१२ पासुन ७५ संगणक चालक व ०३ लघुलेखक यांना पुढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली असुन मार्च-२०१३ पर्यंत संगणक चालक यांना रु. ६,५००/- व लघुलेखक यांना रु.७,५००/- इतके मासिक मानधन देण्यात येत होते. माहे एप्रिल-२०१३ पासून संगणक चालक यांना रु. ९,५००/- व लघुलेखक यांना रु. १०,५००/- इतके वाढीव मासिक मानधन देणेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सदरच्या नेमणूकींची मुदत दि. ३०/०८/२०१३ रोजी संपत आहे.

सद्यस्थितीत महापालिकेच्या विविध विभागात ७५ संगणक चालक कार्यरत असून ०३ लघुलेखक सचिव विभागात कार्यरत आहेत. यापैकी जे संगणक चालक नियमितपणे उपस्थित राहुन आवश्यक सेवा बजावतात, त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेस सेवा देतांना कर्तव्यपरायणता व शिस्त न पाळणाऱ्या संगणक चालकांना मुदतवाढ न देता त्यांच्या सेवा खंडीत करणे उचीत ठरेल.

महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये रु. ९५.०० लाख इतकी तरतुद करणेत आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाचा बोजा पाहता संगणक चालक तसेच लघुलेखक यांची मुदत दि. ३०/०८/२०१३ रोजी संपत असल्याने संगणक चालक व लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सध्याच्या मानधनावर एक वर्षाची मुदतवाढ देणेस ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३२, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मोर्वा, उत्तन, पाली, चौक व काजूपाडा येथील शाळा इमारतीचे पुर्नबांधणी करणे कामाबाबत निर्णय घेणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मोर्वा, उत्तन, पाली, चौक व काजूपाडा येथील कोलारू शाळा इमारती सन १९९३ मध्ये जिल्हापरिषदेच्या ताब्यातून तत्कालिन नगरपारिषदेच्या ताब्यात आल्या आहेत. सदर शाळा इमारती कौलारू असून मोडकळीस आलेल्या आहेत. शहरातील इतर सर्व शाळा इमारती ह्या महानगरपालिकेने टप्याटप्याने आर.सी.सी. स्वरूपात बांधलेल्या आहेत. वरील शाळा इमारती पैकी काजूपाडा येथील शाळा इमारती वगळता सी.आर.झेड. ने बाधित होत आहेत. सदर शाळा इमारतींची पुर्नबांधणी करण्याची आवश्यक असल्याने सी.आर.झेड. च्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र सागरी क्षेत्र नियंत्रण प्राधिकरण (MCZMA) यांनी सदर प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेले आहेत. सदर शाळा इमारतींची तळ अधिक चार मजल्यापर्यंत पूर्नबांधणी करण्याकरीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मोर्वा येथे शाळा इमारत बांधणे | रू. २,३३,४६,३१५/- |
| २) | उत्तन येथे शाळा इमारत बांधणे | रू. १,०८,६४,३२३/- |
| ३) | पाली येथे शाळा इमारत बांधणे | रू. १,३६,०२,४६२/- |

४) चौक येथे शाळा इमारत बांधणे रू. २,८३,५३,५४७/-
५) काजुपाडा येथे शाळा इमारत बांधणे रु. २,२२,९४,१४९/-

वरील शाळागृह इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी येणारा खर्च महानगरपालिका करण्यास तयार असल्याबाबतचा निर्णय केंद्र शासनास कळविण्यात यावे. सदर शाळेच्या पुर्नबांधणी करण्याच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात यावी. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मोर्वा, उत्तन, पाली, चौक व काजूपाडा येथील शाळा इमारतीचे पुर्नबांधणी करणे कामाबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मोर्वा, उत्तन, पाली, चौक व काजूपाडा येथील कोलारू शाळा इमारती सन १९९३ मध्ये जिल्हापरिषदेच्या ताब्यातून तत्कालिन नगरपारिषदेच्या ताब्यात आल्या आहेत. सदर शाळा इमारती कौलारू असून मोडकळीस आलेल्या आहेत. शहरातील इतर सर्व शाळा इमारती ह्या महानगरपालिकेने टप्याटप्याने आर.सी.सी. स्वरूपात बांधलेल्या आहेत. वरील शाळा इमारती पैकी काजूपाडा येथील शाळा इमारती वगळता सी.आर.झेड. ने बाधित होत आहेत. सदर शाळा इमारतीची पुर्नबांधणी करण्याची आवश्यक असल्याने सी.आर.झेड. च्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र सागरी क्षेत्र नियंत्रण प्राधिकरण (MCZMA) यांनी सदर प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेले आहेत. सदर शाळा इमारतींची तळ अधिक चार मजल्यापर्यंत पूर्नबांधणी करण्याकरीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१) मोर्वा येथे शाळा इमारत बांधणे रू. २,३३,४६,३१५/-
२) उत्तन येथे शाळा इमारत बांधणे रू. १,०८,६४,३२३/-
३) पाली येथे शाळा इमारत बांधणे रू. १,३६,०२,४६२/-
४) चौक येथे शाळा इमारत बांधणे रू. २,८३,५३,५४७/-
५) काजुपाडा येथे शाळा इमारत बांधणे रु. २,२२,९४,१४९/-

वरील शाळागृह इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी येणारा खर्च महानगरपालिका करण्यास तयार असल्याबाबतचा निर्णय केंद्र शासनास कळविण्यात यावे. सदर शाळेच्या पुर्नबांधणी करण्याच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात यावी. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३३, भाईंदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी बंद किऑस्क (स्टॉल) भाड्याने चालविण्यास देण्यास मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र. १२२ चौपाटी करीता राखीव असून सदर आरक्षणातील जागेपैकी १४.०० हेक्टर जागा जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांच्याकडून संरक्षणासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत श्रीगणेश विसर्जन व्यवस्थेसाठी विविध सोयी करण्यात आलेल्या आहेत. सदर ठिकाणी नागरीक, रहिवांशी मोठ्या प्रमाणावर फिरावयास येत असतात. सदर ठिकाणी हातगाड्यावाले उभे राहून खाद्यविक्रि करत असतात. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत नॉन मेटॅलिक किऑस्क (स्टॉल) स्वखर्चाने उभारण्यास परवानगी दिल्यास त्यांच्यामार्फत खाद्यविक्रि होऊन नागरीकांना चांगल्या प्रतीचे खाद्य उपलब्ध होऊ शकेल व हातगाडीवाल्यांना मज्जाव करता येईल. सदर किऑस्क ६ फुट x ६ फुट मोजमापाचे स्वखर्चाने संबंधितानी बसवावयाचे आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २१/०१/२०१३ ठराव क्र. १८ अन्वये सदर ठिकाणी १० नग किऑस्क ५ वर्ष मुदतीने बसविण्यासाठी मान्यता दिल्यानूसार निविदा प्रक्रिया करून दर मागविण्यात

आलेले होते. चालू बाजारभावानुसार (रेडी रेकनरनुसार) सदर १० किऑस्कच्या जागेचे भाडे रु. ४२,५००/- एवढे होत होते. तथापी निविदा मागविल्यानंतर मे. एकता कंन्स्ट्रक्शन यांनी १० नग किऑस्क करीता रू. ६०,२००/- वार्षिक भाडे देण्याचे दर सादर केलेले आहेत. तरी रु. ६०,२००/- वार्षिक भाडे आकारून ५ वर्ष मुदतीसाठी किऑस्क (स्टॉल) भाड्याने देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३३ :-**

भाईंदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी बंद किऑस्क (स्टॉल) भाड्याने चालविण्यास देण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र. ३४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र. १२२ चौपाटी करीता राखीव असून सदर आरक्षणातील जागेपैकी १४.०० हेक्टर जागा जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांच्याकडून संरक्षणासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत श्रीगणेश विसर्जन व्यवस्थेसाठी विविध सोयी करण्यात आलेल्या आहेत. सदर ठिकाणी नागरीक, रहिवांशी मोठ्या प्रमाणावर फिरावयास येत असतात. सदर ठिकाणी हातगाड्यावाले उभे राहून खाद्यविक्रि करत असतात. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत नॉन मेटॅलिक किऑस्क (स्टॉल) स्वखर्चाने उभारण्यास परवानगी दिल्यास त्यांच्यामार्फत खाद्यविक्रि होऊन नागरीकांना चांगल्या प्रतीचे खाद्य उपलब्ध होऊ शकेल व हातगाडीवाल्यांना मज्जाव करता येईल. सदर किऑस्क ६ फुट x ६ फुट मोजमापाचे स्वखर्चाने संबंधितानी बसवावयाचे आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २१/०१/२०१३ ठराव क्र. १८ अन्वये सदर ठिकाणी १० नग किऑस्क ५ वर्ष मुदतीने बसविण्यासाठी मान्यता दिल्यानूसार निविदा प्रक्रिया करून दर मागविण्यात आलेले होते. चालू बाजारभावानुसार (रेडी रेकनरनुसार) सदर १० किऑस्कच्या जागेचे भाडे रु. ४२,५००/- एवढे होत होते. तथापी निविदा मागविल्यानंतर मे. एकता कंन्स्ट्रक्शन यांनी १० नग किऑस्क करीता रू. ६०,२००/- वार्षिक भाडे देण्याचे दर सादर केलेले आहेत. तरी रु. ६०,२००/- वार्षिक भाडे आकारून ५ वर्ष मुदतीसाठी किऑस्क (स्टॉल) भाड्याने देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील　　　अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३४, भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी हॉल) विकसित करणे कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे गोडदेव येथील स.क्र. ३१२ (जुना) ३६ (नविन) हि.क्र. व स.क्र. ३२२ (जुना) ३४ (नविन) हि.क्र. १७ ही जागा आरक्षण क्रमांक २१८ कम्युनिटी हॉल करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र २६००.०० चौ.मीटर एवढे असून पुर्ण जागा ताब्यात आली आहे. सदर कम्युनिटी हॉल बांधण्याकरीता रु. ४,८२,५८,६००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. महापालिका प्रशासनाला सदरची जागा पुर्णपणे ताब्यात घेण्यात यश मिळविले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने आरक्षित जागा विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतुद करण्यात आलेली आहे व त्या लेखाशिर्षाखाली किती शिल्लक आहे त्याची माहिती दिलेली नाही. तसेच महापालिका क्षेत्रात आणखी किती आरक्षित कम्युनिटी हॉलची जागा ताब्यात घेणे बाकी आहे व त्यांची आजची परिस्थिती ह्यांची माहिती दिलेली नाही. तरी सदरची माहिती परिपूर्ण पध्दतीने गोषवाऱ्यामध्ये नमुद करुन विषय महासभेच्या मान्यतेसाठी फेरसादर करावा.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३४ :-**

भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी हॉल) विकसित करणे कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ३५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे गोडदेव येथील स.क्र. ३१२ (जुना) ३६ (नविन) हि.क्र. व स.क्र. ३२२ (जुना) ३४ (नविन) हि.क्र. १७ ही जागा आरक्षण क्रमांक २१८ कम्युनिटी हॉल करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र २६००.०० चौ.मीटर एवढे असून पुर्ण जागा ताब्यात आली आहे. सदर कम्युनिटी हॉल बांधण्याकरीता रु. ४,८२,५८,६००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. महापालिका प्रशासनाला सदरची जागा पुर्णपणे ताब्यात घेण्यात यश मिळविले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने आरक्षित जागा विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतुद करण्यात आलेली आहे व त्या लेखाशिर्षाखाली किती शिल्लक आहे त्याची माहिती दिलेली नाही. तसेच महापालिका क्षेत्रात आणखी किती आरक्षित कम्युनिटी हॉलची जागा ताब्यात घेणे बाकी आहे व त्यांची आजची परिस्थिती त्यांची माहिती दिलेली नाही. तरी सदरची माहिती परिपूर्ण पध्दतीने गोषवाऱ्यामध्ये नमुद करुन विषय महासभेच्या मान्यतेसाठी फेरसादर करावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३५, आरक्षण क्र. २३१, मार्केट विकसित करणेस प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३००/१ बी, २अे४५/१ बी, २अे, ३००/१ बी, २अे४५/१ बी, २अे आरक्षण क्र. २३१ मार्केट करिता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २५००.०० चौ.मीटर असून बहुतांशी जागा ताब्यात आहे. सदर जागेत मार्केट इमारत बांधण्याकरीता रु. ३,७१,२२,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. मात्र प्रशासनाने आरक्षित जागा विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतुद करण्यात आलेली आहे व त्या लेखाशिर्षाखाली किती शिल्लक आहे त्याची माहिती दिलेली नाही. तसेच महापालिका क्षेत्रात आणखी आरक्षित मार्केटची जागा ताब्यात घेणे बाकी आहे व त्यांची आजची परिस्थितीची माहिती दिलेली नाही. तरी सदरची माहिती परिपूर्ण पध्दतीने गोषवाऱ्यामध्ये नमुद करुन विषय मा. महासभेच्या मान्यतेसाठी फेरसादर करावा.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, हमारे प्रभाग में होली क्रॉस स्कूल के पास एक मार्केट आरक्षण है। उसमे ४ हजार मिटर आरक्षण है। मेरी यह सुचना है की वहाँ भी मार्केट का प्रोव्हिजन किया जाए। सुचना में लिया जाए। ताकी नवघर रोड और जेसलपार्क के लोगो को वहाँ बसाया बाए। और रोड क्लियर हो जाए।

**राजेश वेतोसकर :-**

सदर सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

आप सुचना दो मैं मंजूर कर रही हूँ। ठराव सुचनेसह मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. ३५ :-**

आरक्षण क्र. २३१, मार्केट विकसित करणेस प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ३६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३००/१ बी, २अे४५/१ बी, २अे, ३००/१ बी, २अे४५/१ बी, २अे आरक्षण क्र. २३१ मार्केट करिता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २५००.०० चौ.मीटर असून बहुतांशी जागा ताब्यात आहे. सदर जागेत मार्केट इमारत बांधण्याकरीता रु. ३,७१,२२,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. मात्र प्रशासनाने आरक्षित जागा विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतुद करण्यात आलेली आहे व त्या लेखाशिर्षाखाली किती शिल्लक आहे त्याची माहिती दिलेली नाही. तसेच महापालिका क्षेत्रात आणखी आरक्षित मार्केटची जागा ताब्यात घेणे बाकी आहे व त्यांची आजची परिस्थितीची माहिती दिलेली नाही. तरी सदरची माहिती परिपूर्ण पध्दतीने गोषवाऱ्यामध्ये नमुद करुन विषय मा. महासभेच्या मान्यतेसाठी फेरसादर करावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे व अनुमोदक श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयाप्रमाणे आरक्षण क्रमांक १०८ मार्केटसाठी आरक्षीत आहे. सदर मार्केटचे ४००० चौ.मी. इतके क्षेत्रफळ आहे. यापैकी काही जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली असून सदर जागेवर मार्केट विकसीत करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे तसेच शिल्लक असलेली जागा लवकरात लवकर ताब्यात घेण्याकरीता पुढील कार्यवाही करावी, अशी सुचना मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३६, राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापन करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

राज्यातील नागरी भागातील अनाधिकृत बांधकामे/अतिक्रमणे नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना करण्याकरिता नागरि पोलीस ठाणे व यंत्रणा निर्माण करणेबाबत शासनाने दि. ०२ मार्च २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. सदरच्या धोरणात्मक निर्णयानुसार पोलीस अधिकारी/कर्मचारी निर्माण करावयाच्या ७० पदास मा. महासभा ठराव क्र. १८, दि. ०१/०७/२००९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. व त्यानुसार दि. ०४/०७/२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनाचे नगर विकास विभागास सादर करण्यात आला होता. परंतु शासनाचे दि. १७/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने ठरावाद्वारे मंजूर केलेल्या प्रस्तावामध्ये अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरुपात शासनाकडे जमा करणे बाबत अट घालून नव्याने मंजूरीचा ठराव शासनास पाठविण्यास कळविले आहे.

त्यानुसार दि. २०/०२/२०१३ रोजीच्या महासभेसाठी नागरि पोलीस ठाणे व यंत्रणा अंतर्गत नियुक्त करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते मंजूरीसाठी प्रस्ताव व गोषवारा दि. ०७/०२/२०१३ रोजी सादर करण्यात आला होता.

मा. महासभा ठराव क्र. ५९, दि. २०/०२/२०१३ अन्वये वेतन/भत्ते यावर दरमहा अपेक्षीत खर्च परिगणना करुन आणि तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे कामकाजावरील प्रशासकीय नियंत्रणाबाबत शासनाचे मार्गदर्शन मागवून फेर सादर करण्याबाबत निर्णय झालेला आहे.

नागरि पोलीस ठाणे व यंत्रणेसाठी नियुक्त करावयाच्या एकुण ७० अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी मासिक वेतन रक्कम रु. ०१ कोटी व वार्षिक वेतन रक्कम रु. १२ कोटी वेतन व भत्यावर खर्च अपेक्षीत आहे.

पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासकीय नियंत्रण हे संबंधित जिल्ह्यातील पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे राहिल असे नगर विकास विभागाने दि. २७/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.

मा. उच्च न्यायालयातील प्रलंबित जनहित याचिका क्र. १,३५ व ३६/२००७ मधील आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या पूर्ततेबाबत शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत विकासाच्या विविध योजना कार्यन्वित आहेत. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत भुयारी गटार योजना, नगरोत्थान अंतर्गत एकात्मिक नाले योजना तसेच जवळच्या भविष्यात शहराकरीता अतिरिक्त पाणी पुरवठा योजना राबविल्या जात आहेत. महापालिकेला उत्पान्नाचे स्त्रोत विशेषतः जास्त नसल्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून घेतलेल्या कर्जाची परतफेडही करणे गरजेचे आहे. तरी शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनाधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेकरीता अनुदानाच्या स्वरुपातच सदर विषयाबाबत आर्थिक मदत करावी.

महानगरपालिकेने वर्तमान पध्दतीनेच अतिक्रमणे/अनाधिकृत बांधकामे निष्कासन करण्यासाठी पोलिस बंदोबस्त घेत आहे ही कार्यपध्दत तशीच राबवावी असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३६ :-**

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापन करणेबाबत

**ठराव क्र. ३७ :-**

राज्यातील नागरी भागातील अनाधिकृत बांधकामे/अतिक्रमणे नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना करण्याकरिता नागरि पोलीस ठाणे व यंत्रणा निर्माण करणेबाबत शासनाने दि. ०२ मार्च २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. सदरच्या धोरणात्मक निर्णयानुसार पोलीस अधिकारी/कर्मचारी निर्माण करावयाच्या ७० पदास मा. महासभा ठराव क्र. १८, दि. ०१/०७/२००९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. व त्यानुसार दि. ०४/०७/२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनाचे नगर विकास विभागास सादर करण्यात आला होता. परंतु शासनाचे दि. १७/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने ठरावाद्वारे मंजूर केलेल्या प्रस्तावामध्ये अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरुपात शासनाकडे जमा करणे बाबत अट घालून नव्याने मंजूरीचा ठराव शासनास पाठविण्यास कळविले आहे.

त्यानुसार दि. २०/०२/२०१३ रोजीच्या महासभेसाठी नागरि पोलीस ठाणे व यंत्रणा अंतर्गत नियुक्त करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते मंजूरीसाठी प्रस्ताव व गोषवारा दि. ०७/०२/२०१३ रोजी सादर करण्यात आला होता.

मा. महासभा ठराव क्र. ५९, दि. २०/०२/२०१३ अन्वये वेतन/भत्ते यावर दरमहा अपेक्षीत खर्च परिगणना करुन आणि तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे कामकाजावरील प्रशासकीय नियंत्रणाबाबत शासनाचे मार्गदर्शन मागवून फेर सादर करण्याबाबत निर्णय झालेला आहे.

नागरि पोलीस ठाणे व यंत्रणेसाठी नियुक्त करावयाच्या एकुण ७० अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी मासिक वेतन रक्कम रु. ०१ कोटी व वार्षिक वेतन रक्कम रु. १२ कोटी वेतन व भत्यावर खर्च अपेक्षीत आहे.

पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासकीय नियंत्रण हे संबंधित जिल्ह्यातील पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे राहिल असे नगर विकास विभागाने दि. २७/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.

मा. उच्च न्यायालयातील प्रलंबित जनहित याचिका क्र. १,३५ व ३६/२००७ मधील आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या पूर्ततेबाबत शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत विकासाच्या विविध योजना कार्यन्वित आहेत. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत भुयारी गटार योजना, नगरोत्थान अंतर्गत एकात्मिक नाले योजना तसेच जवळच्या भविष्यात शहराकरीता अतिरिक्त पाणी पुरवठा योजना राबविल्या जात आहेत. महापालिकेला उत्पान्नाचे स्त्रोत विशेषतः जास्त नसल्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून घेतलेल्या कर्जाची परतफेडही करणे गरजेचे आहे. तरी शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनाधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेकरीता अनुदानाच्या स्वरुपातच सदर विषयाबाबत आर्थिक मदत करावी.

महानगरपालिकेने वर्तमान पध्दतीनेच अतिक्रमणे/अनाधिकृत बांधकामे निष्कासन करण्यासाठी पोलिस बंदोबस्त घेत आहे ही कार्यपध्दत तशीच राबवावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३७, इमारती बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डास प्रतिबंधक उपाययोजना उपविधीस अंतिम मंजूरी मिळणे बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे केल्या जाणाऱ्या डास प्रतिबधंक उपाययोजना संदर्भात तयार करण्यात आलेल्या “इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी-२०१२” स ही महासभा अंतिम मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. ३७ :-**

इमारती बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डास प्रतिबंधक उपाययोजना उपविधीस अंतिम मंजूरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे केल्या जाणाऱ्या डास प्रतिबंधक उपाययोजना संदर्भात तयार करण्यात आलेल्या "इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी-२०१२" स ही महासभा अंतिम मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रूग्णालय हस्तांतरित करुन घेण्यास शासनाने तत्वतः मान्यता दिलेली आहे. सदर रुग्णालय शासनाने चालविण्यास घ्यावे यासाठी प्रयत्न केल्याबद्दल मा. उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार, मा. आरोग्यमंत्री श्री. सुरेशजी शेट्टी, मा. नगरविकास राज्यमंत्री श्री. उदयजी सावंत, मा. पालकमंत्री श्री गणेशजी नाईक, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्टजी मेंडोसा, मा. आमदार श्री मुझफ्फरजी हुसेन, मा. महापौर श्रीम. कॅटलिन परेरा व मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहॉं नजर हुसेन यांच्या अभिनंदनाचा ठराव ही महासभा करत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रूग्णालय हस्तांतरित करुन घेण्यास शासनाने तत्वतः मान्यता दिलेली आहे. सदर रुग्णालय शासनाने चालविण्यास घ्यावे यासाठी प्रयत्न केल्याबद्दल मा. उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार, मा. आरोग्यमंत्री श्री. सुरेशजी शेट्टी, मा. नगरविकास राज्यमंत्री श्री. उदयजी सावंत, मा. पालकमंत्री श्री गणेशजी नाईक, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्टजी मेंडोसा, मा. आमदार श्री मुझफ्फरजी हुसेन, मा. महापौर श्रीम. कॅटलिन परेरा व मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहॉं नजर हुसेन यांच्या अभिनंदनाचा ठराव ही महासभा करत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरीता २ "ज" चे प्रस्ताव आले आहेत. पहिला प्रस्ताव सन्मा. प्रशांत केळूसकर ह्यांचा आहे ते गैरहजर आहेत. दुसरा ३९ नंबरचा प्रशांत केळूसकर यांचा आहे. ते गैरहजर असल्यामुळे प्रस्ताव चर्चेला घेता येणार नाही.

**मा. महापौर :-**

मी सन्मा. चक्रे मॅडम तुम्हाला बोलायला पाच मिनिट देत आहे.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय मला एवढच सांगायचे आहे की, मी सभापती पदाचा पदभार सांभाळल्यापासून माझे प्रभाग ६ चे प्रभाग अधिकारी चंद्रकांत बोरसे हे आजपर्यंत मला एक वेळाही भेटले नाहीत. वारंवार मी फोन करते माझा फोन त्यांनी डायवर्टवर ठेवला आहे. हे सभागृहाला सांगण्याची गरज आहे. हे कळल पाहिजे असे का होते. ते मला एकदा पण येऊन भेटले नाहीत. नगरसेवकांची मी मिटींग बोलावली त्या मिटींगमध्ये आमचा गोषवारा ठराव पास झालेला आहे. त्याचे कव्हरींग लेटर बांधकाम विभागाला द्यायला लागते. आणि त्याचे सुचक अनुमोदन ते त्यांनी केले नाही. मा. महापौर मॅडम, फार गंभीर विषय आहे. मागच्या वेळेला नाईक साहेब असताना सुदाम गोडसे होते तेव्हा पण असेच झाले आहे. तीन महिने उशीरानी सभापतीची निवडणूक झाली आहे. आणि चार महिने हे पूर्ण झाले. साहेब तुम्ही त्यांना सभागृहात बोलवून

विचारा. मी वारंवार मा. आयुक्तांना सांगितले, मा. महापौरांना सांगितले, मी ढगे साहेबांना देखील सांगितले ढगे साहेबांनी मला काय उत्तर द्यावे. मी बोलले साहेब काम होत नाही. येत नाही बोलत नाही जनतेची रहदारी वाढलेली आहे. जागा चेंज झाली आहे. इनलिगल बांधकामासाठी एवढी लोक येतात आणि एकही पत्राचे उत्तर हे देत नाहीत. तुम्ही त्यांना विचारुन सांगा. ढगे साहेब इथे आहेत त्यांना मी फोन वरुन विचारल साहेब ते का येत नाही मी काय कराव, शासकीय काम मी कस करणार आहे. माझा हा गंभीर विषय आहे. ढगे साहेबांनी काय सांगावे हे काम करत नाही ते काम करत नाही तुम्ही असे बोलता मी गावावरुन माणस आणू का? हे ढगे साहेबाचे उत्तर आहे. समोर विचारा, मला ह्याचे उत्तर द्यावे. मी पण अनेक वर्ष झाली काम करते. काकानी साहेबाना फोन केला, साहेब बाहेर होते. साहेब म्हणाले मी त्यांना सांगतो. मी काय कराव त्यांना मी उत्तर दिल असत तर काय केल असत ते त्यांच्या गावावरुन आणून देणार आहेत का? मला ह्याचे उत्तर द्यावे. क्लास थ्री चा इंजिनियर श्रीकृष्ण मोहिते क्लास वन क्लास टूच्या जागेवर बसविले आहे. ३२ क्लास टू चे ऑफिसर गेले कुठे? त्यांना का बसवले नाही. कूठल्या कायद्यात तरतूद आहे ते सांगा. फस्ट क्लास ए.सी. मध्ये एका इंजिनियरला बसवून ठेवले आहे. शून्य देखील काम करत नाही. ह्याचे मला उत्तर द्यावे.

**मा. महापौर :-**

मॅडम बोरसे साहेब आज गैरहजर आहेत. त्यांना मी आणि कमिशनर साहेब त्यांना बोलवून त्यांच्यावर काय कारवाई करायची ती कारवाई करु.

**वंदना चक्रे :-**

मला ढगे साहेबांनी उत्तर द्यावे की, मी माझ्या गावावरुन माणसं आणू का? मा. आयुक्त साहेब, श्रीकृष्ण मोहितेचे उत्तर तुम्ही द्या.

**मा. आयुक्त :-**

कोणाला कोणता प्रभाग द्यावा तो प्रशासनाचा अधिकार आहे. आपल्याला ए.सीला आक्षेप आहे की पदस्थापनेला आक्षेप आहे. हे आधी ठरवायला पाहिजे. आपण म्हणत असाल तर ए.सी. काढून टाकू काही हरकत नाही. कूठलही कामकाज करायच असेल तर कोण अधिकारी कुठे असावा हा प्रशासनाचा अधिकार आहे. त्याची टर्म पूर्ण झाल्यानंतर निश्चित बदलण्यात येईल, मंजूर आकृतीबंधामध्ये ते वर्ग एकच पद आहे, वर्ग दोनच पद आहे किंवा वर्ग तीनच पद आहे असे काही म्हटलेले नाही. त्या पदाचे नामकरण अतिक्रमण प्रमुख म्हणून करण्यात आले आहे. म्हणून ते क्लास वनचे अधिकारी होत नाही. त्यांनी पण मला विनंती केली आहे की, माझी बदली करा त्याचा बीपी वाढतो आहे. म्हणून मी असा निर्णय घेतलेला आहे. त्यांना बोलवून घेतो. नेमकी काय अडचण आहे काय त्रास आहे. ते विचारुन घेतो आणि पूढे आवश्यक तो निर्णय घेतो. त्या पदावर अत्यंत जबाबदारीचे काम असल्यामुळे त्या पदावर सक्षम अधिकारी असणे आवश्यक आहे. मी हे म्हणत नाही की, उपलब्ध अधिकाऱ्यामध्ये सक्षम अधिकारी नाहीत. परंतू हे आपल्याला मान्य आहे. सगळ्यांना माहित आहे की आपल्याकडे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा तूटवडा आहे. आपल्याला आस्थापनेचा खर्च आटोक्यात ठेवायचा आहे. जेणेकरुन विकास कामांना अडथळा होणार नाही. हे सुध्दा बघण महत्वाचं आहे म्हणून एकेक अधिकाऱ्याकडे आपण २-३-४ विभाग दिलेले आहेत आणि त्याला काही पर्याय नाही. आपण अधिकाऱ्याची संख्या वाढवली तर आस्थापनेचा खर्च वाढेल आणि विकास कामावरचा खर्च कमी होईल. हे सुध्दा लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**वंदना चक्रे :-**

साहेब क्लास २ चे ३२ अधिकारी सक्षम नाहीत का? ते काम करु शकत नाही का? हेच काम करु शकतात का? त्याच्या पापाचा घडा फूटला आणि आता त्यांना जायचे आहे. त्यांनी प्रभाग सहामध्ये काय कारस्थान केले आहे ते मी तुम्हाला दाखवणार आहे. म्हणून मला सभागृहामध्ये सगळ्यासमोर बोलायचं होत, शासनाची बोलतात ना मी साहेबाचे मानणार नाही. कारण मला आता त्रास झाला मागच्या वेळीस देखील त्रास झाला. मागच्या वेळीस देखील त्रास झाला. हा त्रास मी सहन करणार नाही. माझ ऐकल नाही तर मी तुमच्या चेंबरच्या खाली येऊन सत्याग्रह करीन.

**मा. आयुक्त :-**

जो काही निर्णय घ्यायचा तो आपल्याला घ्यायचा आहे. पण त्याची पद स्थापना मी इथे आयुक्त पदावर हजर होण्यापूर्वी झाली आहे. हा प्रश्न कधीही उपस्थित झालेला नाही. हा प्रश्न पहिल्यांदा उपस्थित होत आहे. ह्याच मलाही आश्चर्य वाटते.

**कमलेश भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो, बोरसे साहेबांना मी अनेक वेळा फोन केला. ते आमचा फोन उचलत नाही. दुसऱ्या फोनवरुन केल्यावर ते चुकून फोन उचलतात आणि आम्ही तक्रारी केल्यावर उलट उत्तर देतात. ते बोलतात आमची बदली करुन टाका. आम्हाला काम करायची गरज नाही. त्याची आपण दखल घ्यावी. अशी मी आपल्याला विनंती करत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. चक्रे मॅडम, मी साहेबांशी बोलते आणि त्याची बदली करायची असेल तर बदली करुन घेऊ.

**वंदना चक्रे :-**

मॅडम, मी बदलीचे म्हणत नाही. प्रभाग समिती चारचे चार प्रभाग अधिकारी आहे तसे ठेवावे. अशी साहेबांची सुचना होती.

**मा. महापौर :-**

प्रभाग सहा झाले ना.

**वंदना चक्रे :-**

दोन वाढले त्याठिकाणी दोन नविन दिले. ते ही आम्हाला मान्य आहे. साहेबांना सांगितले मला अमक्या द्या साहेब बोलले मी तूमच्या मर्जीने देणार नाही. तर मी म्हटले ठिक आहे ते मान्य आहे. मग ते असताना काम करत नाही. बोरसे आणि श्रीकृष्ण मोहितेला सुध्दा पळून जायचे आहे आणि ह्यांना असा मी पळू देणार नाही.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी प्रभाग समिती पाचचा सभापतीचा पदभार सांभाळून तीन महिने झाले. वारंवार तक्रार करुन मला लिपीक किंवा शिपाई देण्यात आलेला नाही. त्या संदर्भात कमिशनर साहेबांना दोन वेळा भेटलो होतो. ढगे साहेबांकडे भेटायला गेलो होतो तर ते म्हणतात मलाच खुर्च्या आणायला दुसऱ्या कार्यालयातून मलाच आणायला लागतात अशी उत्तर मला भेटतात. अशा गोष्टीचा विचार केला तर मी कार्यालय कसे चालवावे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम मला ह्या विषयावर बोलायचे आहे. आज आपल पूर्ण प्रशासन मिरा भाईंदरचे आरोग्य आपण बी.ओ.टी. वर चालवतो. ठेकेदार पध्दतीने चाललेले कामकाज आरोग्याचे पूर्ण कामकाज ठेके पध्दतीवर चालवतो, वृक्षप्राधिकरण चालवतो. आपल्याकडे कर्मचारी वर्ग कमी नाही. आपल्या स्थायी आस्थापनेचा खर्च ३३ कोटीवर गेलेला आहे. आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याच्या बाहेर प्युनची रांग लागलेली आहे त्यांना कामाला लावा. ही खरी परिस्थिती आहे.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

मॅडम मी नगरसेवक झालो आहे मला त्या गोष्टीची लाज वाटायला लागली आहे. माझ्याकडे लोक तक्रार घेऊन येतात त्या कम्पलेन्ट मी अधिकाऱ्यांना करतो. त्याच्यावर अजिबात लक्ष दिले जात नाही. त्या संदर्भात माझे मा. आयुक्त साहेबांशीपण भांडण झाले. ते म्हणाले की, तुमची भाषाशैली बदला. पण मी त्यांना एकच विनंती करतो की, मी दिलेल्या ज्या तक्रारी आहेत, त्यावर त्यांनी बारकाईने लक्ष दिले, तर त्यांना त्या गोष्टीचे गांभिर्य माहिती पडेल. आणि ते अधिकाऱ्यांना पाठीशी का घालतात या गोष्टीची मला कल्पना नाही. तर मला त्यांनी ते उत्तर द्यावे.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे जी अडचण आहे, आपल्याला आस्थापनेमध्ये खर्च कमी ठेवायचा आहे. उपलब्ध मनुष्यबळाकडून काम करुन घ्यायचे आहे. पण याचा अर्थ हा नाही की, अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी कोणाशी सौजन्याने वागू नये किंवा बोलू नये. म्हणून मी माझ्या अधिकारी आणि कर्मचारी यांना सक्त सुचना देतो की, त्यांनी आपले सर्व पदाधिकारी आणि सर्व लोकप्रतिनिधी यांच्याशी सौजन्याची वागणूक ठेवावी. अन्यथा त्यांच्यावर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येईल. हा एक भाग झाला. दुसरे मी सांगितल्याप्रमाणे जे उपलब्ध मनुष्यबळ आहे. त्यांच्याकडून जास्तीत जास्त काम कसे करुन घेता येईल याच्याकडे लक्ष देण्यात येईल. सध्या आपल्या महापालिकेचा व्याप वाढत चाललेला आहे. विभागाची संख्या वाढत चाललेली आहे. यासाठी निश्चितपणे मनुष्यबळ कमी आहे. पण त्या उपलब्ध मनुष्यबळामध्ये आणखीन चांगल्या पध्दतीने आपल्याला कसे काम करता येईल हे सुध्दा पाहिले जाईल. आणि कुठल्याही प्रभागामध्ये कर्मचाऱ्यांमुळे कुठलेही काम खोळंबून राहू नये यासाठी मी माझ्या सहकारी अधिकाऱ्यांशी चर्चा देखील केलेली आहे. एकच काम एका व्यक्तीने न करता त्या व्यक्तीने दोन-तीन कामे देऊन या शहराचे लहान-लहान म्हणजे वॉर्डपेक्षाही लहान भाग करुन त्या भागाचे काम त्याला द्यावे. म्हणजे त्यामुळे ते एकच काम, पाणी पुरवठा वसुली असो, मालमत्ता कर वसुली असो किंवा परवाना फी वसुली असो किंवा इतर कुठलेही काम असो. तर त्या दोघातिघांच्या चमूला आपण देऊन त्या पध्दतीने काम करुन घेऊ. म्हणजे पाणी पुरवठ्यासाठी वेगळा माणूस जायला नको, मालमत्ता कर वसुल करण्यासाठी वेगळा माणूस जायला नको, आणि परवाना कर वसुल करण्यासाठी वेगळा माणूस जायला नको. तो सुध्दा आहे. येत्या महिन्याभरामध्ये तीसुध्दा पध्दत अंमलात येईल. जेणेकरुन प्रत्येक प्रभागामध्ये एकतर पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होईल आणि आपल्या प्रभागामध्ये, म्हणजे तो कुठलाही प्रभाग सहा असो, प्रभाग चार असो, प्रभाग पाच असो किंवा प्रभाग एक, दोन, तीन असो. कुठल्याही प्रभागामध्ये तेथील जनतेला मुख्यालयामध्ये यावे लागू नये हासुध्दा प्रयत्न केला जाईल. मी पुःनश्च एकदा सांगतो, माझे अधिकारी, कर्मचारी इथे उपलब्ध आहेत आणि जे उपलब्ध नाहीत त्यांना, की त्यांनी लोकप्रतिनिधी, नगरसेवक, पदाधिकारी यांच्याशी सगळ्यांशी जाणीवपूर्वक आदराची भावना ठेवूनच वागवावे. यासोबत आपल्याकडून देखील तशीच अपेक्षा राहील. धन्यवाद.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

पण साहेब, माझी तिकडे कामे होत नाहीत. बरीच कामे पेंडींग आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपण जी-जी कामे सांगितली, ती सगळी कामे प्रायोरीटीने केलेली आहेत. तरीपण आपण म्हणत असाल की, कामे झालेली नाहीत. तर ते मला मान्य नाही.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

साहेब, मला असे सांगायचे होते की, पाच वर्षापूर्वीची जी कामे आहेत, अनधिकृत कामे आहेत म्हणून सांगितले जाते.

**मा. आयुक्त :-**

इथे काहीतरी गोंधळ होतो आहे. अनधिकृत बांधकामासाठी आपण वेगळा कक्ष केलेला आहे. आपल्या काही अडचणी, आपल्या काही तक्रारी असतील तर प्रभाग अधिकाऱ्यांना आपण डेटा सोपवा. अतिरिक्त आयुक्तांना देखील प्रभाग दिलेला आहे. अतिक्रमण विरोधी पथकदेखील गठित करण्यात आलेले आहे. त्याबद्दल आपल्या काही कम्पलेंट असतील तर त्यांच्याकडे आपण द्याव्या. म्हणजे त्यांच्याकडून निराकारण करता येईल. कारण इथे मी सांगितल्याप्रमाणे शहराचा व्याप मोठा होत चाललेला आहे. तर प्रत्येक गोष्टींची अपेक्षा आपण प्रभाग अधिकाऱ्यांकडून करु शकत नाही. मग अतिक्रमण विषयक आपल्या ज्या काही समस्या, अडचणी असतील, त्या आपण मुख्यालयामध्ये देखील पाठवू शकता.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

साहेब, गायीसंदर्भात प्रश्न होता. सांगून दिड-दोन महिने झाले. पानपट्टे साहेब, कुरळेकर साहेबांवर टाकतात. कुरळेकर साहेब, पानपट्टे साहेबांवर टाकतात. त्या गायींचा प्रश्न अजून सॉल्व्ह झालेला नाही. श्री. पानपट्टे साहेबांना पाहिजे तर विचारा.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, हा हरकतीचा मुद्दा आहे. ती खरी परिस्थिती आहे. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. लोक आमच्याकडे सातत्याने तक्रारी करत असतात. छोटासा विषय आहे. आपण कोंडवाडा केलेला आहे. अनधिकृतपणे गायी, म्हशी बांधणे किंवा त्यांच्या माध्यमातून व्यवसाय करणे याचा अधिकार आपल्या पालिकेने कोणाला दिलेला नाही. मग अधिकारी त्याच्यावर कारवाई का करत नाहीत? कुठलाही पदाधिकारी व्यक्तीगत स्वतःच्या स्वार्थासाठी काहीच बोलत नाही. तो एक लोकप्रतिनिधी आहे. लोकांनी त्याला निवडून दिलेले आहे. लोक त्याच्याकडे जी तक्रार करतात ती तक्रार त्याने प्रशासना समक्ष आणण्याचे त्याचे जे कर्तव्य असते, तेवढे तो पार पाडतो. अधिकारी वर्ग काम करत नाही. आता आपण अतिक्रमणचा उल्लेख केला. प्रभाग अधिकारी आहेत, अतिक्रमण पथक आहे, अतिरिक्त आयुक्त आहेत. साहेब तुमच्या विभागीय अधिकाऱ्यांचे वर्तमानपत्रामध्ये रोज लेख येतात की, मला जिवे मारण्याच्या धमक्या येतात. मला खासदारांच्या माध्यमातून, आमदारांच्या माध्यमातून, लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून फोन येतात. त्यांनी स्पष्ट आरोप केलेले आहेत. त्यांनी अशी त्यांची नावे तरी सांगावी की, त्यांना आमदार, खासदार, लोकप्रतिनिधींचे येतात की बिल्डरांचे येतात.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझा असा प्रश्न आहे. माझ्या ४३ मतदार संघामध्ये खूप डुक्कर पाळलेले आहेत त्याची पूर्ण यूनिटी आहे मी पानपट्टे साहेबांना सांगते की, ह्याच्यावर कारवाई करा.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला पानपट्टे साहेब आणि कुरळेकर साहेबांकडून उत्तर पाहिजे.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. म्हात्रे साहेबांची तक्रार होती. त्यानुसार मी आणि पानपट्टे साहेबांनी तिकडे जाऊन व्हिजीट केली. तिकडे एकूण ८ गाई होत्या. त्यातील दोन गाई वसईला गोशाळेमध्ये शिफ्ट केल्या आहेत. उर्वरित ६ गाईपैकी एक गाय ठेऊन बाकी कुठेतरी शिफ्ट केल्या होत्या त्या कुठे शिफ्ट केल्या ते प्रशासनाला सांगितले नाही. म्हात्रे साहेबांचा काल फोन होता. साहेब २-३ गाई पुन्हा आणून बांधल्या आहेत त्यावर आज किंवा सोमवारी त्याच्यावर कारवाई करता येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा फक्त म्हात्रे साहेबांचा प्रश्न नाही तर पूर्ण शहराचा प्रश्न आहे. प्रत्येक मंदिराच्या बाहेर ती लोक बिझनेस करतात. साहेब, गाय बांधणारा माणूस वेगळा असतो आणि बिझनेस करणारा माणूस वेगळा असतो.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

साहेब, मोकाट जनावर मोकळी असतील तर मोकाट म्हणू शकतो. तो मालक स्वतः घेऊन उभा आहे. तर त्या जनावरांना मोकाट अस म्हणता येणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आता बघा तुमच्या अधिकाऱ्याच बोलण आम्ही नगरसेवक आहेत आम्ही मानधन घेतो. तुमचे अधिकारी पगार घेतात. मुंबई महापालिकेमध्ये बाकायदा सिस्टम आहे. ती सिस्टम आम्ही तुम्हाला सांगतो एक टेम्पो येतो एक ट्रक येतो. त्याच्यामध्ये एक फळी लावलेली असते. बी.एम.सी. चे कर्मचारी येतात त्या गाईला

घेतात हाकलतात आणि ती गाय स्टेप्स चढून वरती जाते आणि तो ट्रक त्या कोंडवाड्यामध्ये घेऊन जातात. ही सिस्टम त्यांनी इम्पलीमेन्टेशन केल पाहिजे की आम्ही इम्पलीमेन्टेशन केल पाहिजे. आम्ही त्यांना सजेशन दिले पाहिजे की त्यांनी आम्हाला सांगितले पाहिजे. साहेब आमच काम आहे त्यांना इन्टीमेट करण कारवाई कशी करावी हे त्यांचे काम आहे.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

मला अनेकदा सांगण्यात आले की, आमच्याकडे मनुष्यबळ नाही.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

साहेब, कारवाई कशी करावी हे म्हणण्यापेक्षा तक्रार आली तेव्हा मनुष्यबळ नव्हत फक्त चार कर्मचारी होते. पानपट्टे साहेबांनी नंतर तीन कर्मचारी उपलब्ध करुन दिले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, गाईला मंदिराच्या बाहेर बसवतात तिथे लोक येतात गवत टाकतात, चपात्या टाकतात, तिकडे गोमूत्र आणि त्या शेणाने संपूर्ण परिसर अस्वच्छ होतो. तिकडच्या लोकांना त्रास होतो. साहेब ह्या त्रासाकरीता आम्ही तुम्हाला सांगतो. लोक आम्हाला डबल बोलतात आम्ही गवत टाकतो हे पूण्याच काम करतो ते तुम्ही बंद करता. दुसरे सांगतात साहेब इकडे घाण किती होते बघा. आम्हाला लोकांची डबल बोलणी ऐकायला लागतात. त्यामुळे साहेब, तुम्ही त्याच्यावर, ॲक्शन घ्या. साहेब हे तुमचे सौभाग्य की, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नगरसेवक तुम्हाला सांगतात की, ही कारवाई करा. बाकीचे नगरसेवक सांगतात ही कारवाई करु नका.

**जुबेर इनामदार :-**

आमची चूक आहे. आम्ही अधिकाराचा वापर करत नाही. आम्ही ५६ च्या कारवाया करायला सुरुवात केली तर तुम्हाला कुठे जाता येणार नाही. महासभेला त्याचा अधिकार आहे. ह्याच महासभेने ५६ चा ठराव केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब शहर वाढलेल आहे. काम भरपूर आहे. काम करण्याची मानसिकता आणि हिंमत ही थोडीशी कमतरता आपल्या अधिकाऱ्यामध्ये आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम आता कुरळेकर साहेबांनी सांगितले की, जनावर जी आहेत ती त्यांनी बांधलेल्या बघीतल्या. पण आम्हाला दिवसभर जनावर मोकाट दिसतात. ते त्यांना दिसत नाही ते आमच दुःख आहे.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब मी आपल्याला वारंवार होर्डिग्जच्या संदर्भात पत्र व्यवहार केला आहे. ते होर्डिग्ज काढत नाही. तुम्हाला पत्र दिले, कुरळेकर साहेबांना पत्र दिले त्यांना तोंडी सांगितले ते हो म्हणतात. माझा फोन उचलत नाही. समोर आहेत त्यांना विचारा. फोन केला तर सांगतात मी मिटींगमध्ये होतो. आम्ही समजतो तुम्ही पण मिटींग करता आम्ही पण मिटींगच करतो. साहेब काय सांगतात माझ्याकडे पी.ए. नाही. माझा पी.ए. काढून घेतला अतिरिक्त आयुक्तांकडे गेला. मला शिपाई नाही. मी काय करु. हे आम्हाला सांगता हे तुम्ही मा. आयुक्त साहेबांना सांगायला पाहिजे. साहेब तुम्ही काम करत नाही. मी तुम्हाला वारंवार फोन केलेला आहे. तुम्ही हाताचे ग्लोज वैगेरे सगळ घेतलेल आहे. मग तुम्ही होर्डिग्ज का काढत नाही. नगरसेवकांचे फोन उचलत नाही आणि अशी उत्तर देता. तुम्ही होर्डिग्ज काढले नाही तर आम्ही ऐकणार नाही ह्याचे मला उत्तर द्यावे.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला लिपीक आणि शिपाई कोण देणार ते कळेल का? म्हणजे कोणाकडे गेल्यावर मला लिपीक आणि शिपाई मिळतील ते मला कळेल का? तीन महिने झाले माझाच माणूस वापरतो पगार देऊन नाही तर मी सभागृहात बसणार नाही. मी टाळं मारुन खाली बसण्याचा विचार करतो. माझ्याकडे शिपाई नसल्यामुळे चहाचे कप वैगेरे मलाच द्यावे लागतात. मॅडम ह्याच्यावर तोडगा काढा.

**मा. महापौर :-**

ह्या दोन दिवसात तुम्हाला स्टाफ देते. नाही झाले तर मला फोन करुन सांगा. सभा संपली असे मी जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.३० वाजता**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/११/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ५१ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. कडील रेन्टल हाऊसिंग स्कीम अंतर्गत खालील प्रकल्पाच्या नकाशांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | भूखंडाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | महाजनवाडी<br><br>सुधारीत | सि.स.क्र. ४५०९ ते ४५१३, ४५१७, ४५४७, ४५४८, ४५७२ ते ४५७५, ४६०४, ४६०९, ४६१०, ४६११, ४६५२, ४६९१, ४६९२, ४७०२ ,४७१०, ते ४७२१, ४७२४ ते ४७३२, स.क्र. ९५/१० ते १२, ९५/१४, १५, ९७/३पै. ९७/५पै, सि.स.क्र. ४६३८,४६३९, ४६४७, ४६८६, ते ४६९०, ४७०४ ते ४७०९, ४७२२, स.क्र. ९४/१, ९४/२, २६० पै. सि.स.क्र. ४३६२, ४४५५, ४४५६, ४३६३, ४४५४, ४६१४, ४५१५, ४५१६, ४५१८, ४५१९, ४५२०, ४५४९, ४१००पै. ९६/१, ९६/४ | ५०२०२.७६ चौ.मी |
| २ | नवघर | ४२/१, ४१/६<br>२५६/१, २५४/६<br>सुधारीत | ३३००.०० चौ.मी. |
| ३ | नवघर | १२९, १३०/३ ४४५,<br>४४६/३<br>सुधारीत | ८९०५.०० चौ.मी |
| ४ | महाजनवाडी | १०७/१ पै., १पै., १०८/१,२,३ १०९/१ ते ७,८ पै., ९ अ, १० ते २८, ११०/१पै. ते ५ पै.<br>सुधारीत | ९७००.०० चौ.मी<br><br>११४५२ चौ.मी |
| ५ | मिरा<br>(महाजनवाडी) | सि.टी. एस. क्र. ४४३६ ते ४४५१, ४४८१, ४४८२, ४४८६ ते ४५०८, ४५४० ते ४५४६, ४५६५ ते ४५७१, ४५९९ ते ४६०३, ४६९९, ४३९८ ते ४४०३<br>सुधारीत | ६५४२.९५ चौ.मी. |

वरील प्रकल्पाच्या ठिकाणी सोयी सुविधा पुरविण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. ने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु. ७.९७ कोटी रक्कम वर्ग केलेली आहे. सदर रक्कम मिरा-भाईंदर महानगरपालिकेने "एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे" या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे.

૬૨

૧૭/૧૧/૨૦૧૩

वरील तक्त्यामधील प्रकल्पाच्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या इमारतीकडे जाणारे रस्ते, गटारे यांची कामे करावी लागणार असून त्यांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क रस्ता स्वेता रेसीडेन्सी ते के.डी. एम्पायर पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजूस गटार बांधणे. | रु. २,३६,९८,४५०/- |
| २ | मिरारोड (पूर्व) बेवर्लीपार्क येथील मेरी गोल्ड ते मंगलनगरकडे जाणारा रस्ता तयार करणे व एका बाजूस गटार बांधणे. | रु. १,०४,१३,९५०/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) हटकेश येथिल करण कॉम्पलेक्स ते शांतीवन व आकृती गार्डेनिया येथील उर्वरीत रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु. ६४,५५,३००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) जया अपार्टमेंट बी विंग ते हरी ओम टॉवर/एम आय डी सी-प्लेझंट पार्क रस्ता जोडणारा डी.पी. रस्ता व उर्वरीत गटार बांधणे. | रु. १,५६,२०,५५०/- |

वरील कामे करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. मार्फत रु. ७.९७ कोटी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केलेली असून सदर रक्कमेची तरतूद सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. तरी सदर कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

6/11/13

आयुक्त

मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC5//DK/2013-14/ MG-7

गोषवारा प्राप्त दि: 6/11/2013
संध्याकाळी. ५:55

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२०१३.

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ५२ ) :-** भाईंदर (पू.) आरक्षण क्र. ११९ येथे क्रीडा संकूल विकसीत करणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास व महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणे.

भाईंदर (पू.) आरक्षण क्र. ११९ हे खेळाचे मैदान करीता आरक्षीत आहे. सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. आरक्षण क्र. ११९ खेळाचे मैदान येथे क्रिडा संकूल उभारण्याकरीता स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.डॉ. संजीव नाईक, खासदार ठाणे यांनी कळविले होते. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती ठाणे, जिल्हा यांनी सदर कामासाठी अंदाजपत्रक तयार करणेबाबत या कार्यालयास कळविल्यानूसार सदर कामाचे एकुण रु. २१.३५ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरील काम खासदार निधीतुन करण्याकरीता मा. महासभा दि. २०/०४/२०११ ठराव क्र. १९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रथम टप्प्याच्या कामासाठी मा.डॉ. संजीव नाईक, खासदार यांनी ५.०० कोटी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना कळविले. सदर काम तांत्रिक स्वरुपाचे असल्याने सदर कामी वास्तुविशारद / सल्लागार मे. हितेन सेठी, आर्किटेक्ट प्रा.लि यांची नेमणूक करण्यात येऊन त्यांच्यामार्फत नकाशा तयार करण्यात आला. सदर नकाशास मनपा/नर/३७२८/११-१२ दि.१९/०२/२०१२ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामी प्रथम टप्यातील ५.०० कोटी खासदार निधी उपलब्ध होणार असल्याने ५.०० कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. तदनतर सदर कामासाठी निविदा मागवून मे. शायोना कार्पोरेशन हया ठेकेदारास अंदाजपत्रकातील दरापेक्षा २१.७४% जास्त दराच्या रु. ६,०८,७०,०००/- एवढया रक्कमेच्या निविदेस मा. स्थायी समिती सभा दि.०८/०५/२०१२ रोजीच्या मान्यतेने कार्यादेश देण्यात आला. प्रथम टप्प्यात तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात आर.सी.सी बांधकाम, विट बांधकाम, प्लास्टर, कुंपण भिंत, फ्लोरींग या कामांचा समावेश होता.

सदर कामास सुरुवात केल्यानंतर खासदार मा. श्री. संजीव नाईक यांनी क्रीडा संकुलाच्या कामाच्या ठिकाणी वेळोवेळी भेटी दिल्या व सदर क्रिडा संकूलातील पहिल्या मजल्यावरील शेड, सिपोरेक्स बांधकाम इ. कामे करण्याबाबत सुचना दिल्या.

अ) उपरोक्त पहिल्या टप्प्यातील मूळ कामाव्यतिरिक्त रु. १,२७,१८,९२६/- खर्चाच्या जादा कामामुळे रु.७,३५,८८,९२६/- सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सुधारीत अंदाजपत्रकानुसार रु. १,२७,१८,९२६/- जादा खर्च होणार आहे. सदर सुधारीत अंदाजपत्रकातील सर्व कामे ही मूळ कामाचे ठेकेदार मे. शायोना कार्पोरेशन यांच्या मार्फत करुन घ्यावयाची आहे.

ब) मूळ व सुधारीत अंदाजपत्रकातील जादा करावयाच्या कामाव्यतिरीक्त सदर क्रिडा संकूल कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक लागणारी कामे करण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात नविन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकात प्लंबींग, विद्यूत, पेव्हीट फ्लोअरींग, स्वीमींग पूल, क्रीडा संकूलासाठी लागणारे साहीत्य या कामाचा समावेश आहे.

वरील कामे करणे करीता रु. ६,९५,८०,९१३/- रक्कमेचा खर्च अपेक्षित असून त्या मध्ये तांत्रिक सल्लागार फी चा देखिल अंतर्भाव आहे. सदर नविन अंदाजपत्रकातील कामे दुस-या टप्प्यात पूर्ण केल्यास सदर क्रिडा संकूल कार्यान्वित होऊ शकेल.

वरील प्रमाणे सुधारीत व दुसऱ्या टप्प्यातील कामाचा खर्च धरुन एकूण रु.१४,३१,६९,८३९/- खर्च होणार आहे. सदर कामाचे वास्तुविशारद / कन्सल्टंट यांनी सदर खर्चा बाबत शिफारस केलेली आहे. सदर क्रिडा संकुलनाच्या कामी मा. महासभा दि. २०/०४/२०११ ठराव क्र. १९ अन्वये रु. २१.३५ कोटीच्या रकमेस प्रशासकिय आर्थिक मान्यता दिलेली आहे.

सदर क्रिडा संकूलाची कामे पूर्ण करुन क्रिडा संकूल कार्यान्वित करण्यासाठी रु. ५.०० कोटी ऐवजी सुधारीत रु.७,३५,८८,९२६/- रक्कमेचे व वाढीव कामाचे रु.६,९५,८०,९१३/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. मा. खासदार यांच्याकडून खासदार निधितून उपलब्ध झालेल्या ५.०० कोटी रक्कमे व्यतिरीक्त वाढीव ८.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत दि. १२/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच मा. खासदार यांनी अंदाजपत्रकातील दरापेक्षा २१.७४ % जास्त दराने निविदा मंजूर केल्याने जादा होणारा खर्च खासदार निधी अथवा महानगरपालिकेने निधी उपलब्ध करुन न दिल्यास रु.१,०८,७०,०००/- उपलब्ध करुन त्यांच्या संस्थेमार्फत देण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार त्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. त्या रक्कमेशिवाय सद्यस्थितीत रु.८,२२,९९,८३९/- उपलब्ध होणे आवश्यक आहे. मा. खासदार यांनी खासदार निधीतून काही रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व उर्वरीत रक्कम महानगरपालिकेच्या निधीतून खर्च करावे असे सुचित केले आहे.

महानगरपालिकेच्या चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर क्रीडा संकुलासाठी महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन दयावयाची असल्यास सदर रक्कम उपलब्ध करावी लागेल. तरी सदर कामांच्या सुधारीत व नविन अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच खासदार निधी व्यतिरिक्त रक्कम महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देऊन काम पूर्ण करुन घेण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय होण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC4/DK/2013-14/SG-6

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२०१३

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( ५३ ) :- भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नूतनीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसल पार्क खाडी किनारी महानगरपालिकेने दशक्रिया या विधी करीता शेड बांधलेली आहे. सदर शेडचे नूतनीकरण करणे कामास महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथरीटी यांच्याकडून मंजूरी मिळालेली आहे. सदर कामाकरीता रू. ५६,५४,९८६/- एवढ्या रक्कमेचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर केले असता मा. महासभा दि. ५/०६/२०१३ ठराव क्र. १५ अन्वये सदर विधिकार्य शेडची जागा शासनाची असल्याने त्याची परवानगी घेऊन पुन्हा मा. महासभेत विषय ठेवण्याबाबत निर्णय घेतला होता, त्यानूसार मा. जिल्हाधिकारी यांनी दि. ३०/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये सदर दशक्रीया विधिशेडचे दुरूस्ती व नुतनीकरण काम करण्यास परवानगी दिलेली आहे. तरी सदर कामी येणा-या रु. ५६,५४,९८६/- एवढ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

(signature)

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC4/DK/2013-14/MG-6

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/ ११ /२०१३
## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ५४ :- राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन पदनिर्मितीचा प्रस्ताव मा. महासभा दि. ०१/०७/२००९, ठराव क्र. १८ अन्वये ठराव पारित केला होता. त्या अनुषंगाने दि. ०४/०७/२००९ रोजी शासनास प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविला होता.

महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात पोलीस पथक निर्माण करणे, व पोलीस स्टेशन स्थापन करणे बाबत, अप्पर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली दि. १२/१०/२०१२ रोजी बैठक आयोजित केलेली होती. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने करावयाच्या ठरावाचा प्रारुप मसुदा देऊन सुधारित फेर प्रस्ताव शासनास सादर करण्यास महानगरपालिकेस कळविले होते.

त्याअनुषंगे सदरचा प्रस्ताव मा. महासभा दि. २०/०२/२०१३ प्रकरण क्र. ५१ अन्वये सादर केलेला होता. सदरच्या सभेत ठराव क्र. ५९ अन्वये वेतन/भत्ते यावर दरमहा अपेक्षीत खर्च परिगणना करुन, तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे कामकाजावरील प्रशासकीय नियंत्रणाबाबत शासनाचे मार्गदर्शन मागवून फेर सादर करण्याबाबत निर्णय झालेला होता.

त्याचप्रमाणे या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. १,३५,३६/२००७ या न्यायप्रविष्ठ प्रकरणात महानगरपालिका पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे कामकाजावरील प्रशासकीय नियंत्रणाबाबत शासनाकडून मार्गदशन प्राप्त झाल्यानंतर नागरी पोलीस यंत्रणा निर्माण करणेबाबत त्वरीत निर्णय होईल, असे महानगरपालिकेचे वतीने मा. उच्च न्यायालयात Affidavit-in-Reply दाखल करण्यात आलेले आहे.

वरील मा. महासभा दि. २०/०२/२०१३ ठराव क्र. ५९ अनुषंगे शासनाकडे याबाबत मार्गदर्शन मागविले असता, नगर विकास विभागाने दि. २७/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेकरीता निर्माण करावयाची सदर पदे ही महानगरपालिका ज्या पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त यांचे कार्यक्षेत्रात येत असेल, तर त्या पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत राहतील, असे कळविलेले आहे.

वरील शासनाच्या मार्गदर्शक पत्रानुसार दि. २१/०९/२०१३ रोजी मा. महासभेपुढे प्रकरण क्र. ३६ अन्वये प्रस्ताव विषय पटलावर घेण्यात आला. परंतु ठराव क्र. ३७ हा शासनाच्या प्रारुप मसुद्यानुसार केलेला नाही. सदरच्या ठरावात महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेकरीता राज्यशासनाने अनुदानाच्या

स्वरुपातच सदर विषयाबाबत आर्थिक मदत करणेबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरचा ठराव हा शासनाकडे कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला आहे.

मा. उच्च न्यायालयाने सर्व ठाणे जिल्हातील महानगरपालिका, मा. जिल्हा अधिकारी व महाराष्ट्र शासनाने दाखल केलेल्या शपथ पत्रानुसार सदरची जनहित याचिका क्र. १,३५,३६/२००४ ही दि. २५/१०/२०१३ रोजी निकाली काढून सर्व महानगरपालिकेला स्वतंत्ररित्या आदेशित केलेले आहे. सदरचे आदेश खालील प्रमाणे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेला मा. उच्च न्यायालयाने नागरी पोलीस यंत्रणा व पोलीस कक्ष निर्माण करण्याचा प्रस्ताव सदर आदेश पारित झाल्यापासुन आठ आठवड्याच्या आत उच्च स्थरिय समिती दि. ०३/०७/२०१३ व दि. १५/०७/२०१३ रोजीच्या निर्णयानुसार सादर करणेस आदेशित केलेले आहे.

२) महाराष्ट्र शासनाकडून सदर प्रस्तावास अंतिम मंजूरी मिळाल्यानंतर महानगरपालिकेने नागरी पोलीस यंत्रणा उभी करणेसाठी तत्परतेने कारवाई करणे.

३) मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालयास यापूर्वी शपथपत्राद्वारे दिलेल्या आश्वासनानुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण तोडण्याची कारवाई करणे.

वरील मा. महासभा ठराव क्र. ३७ दि. २१/०९/२०१३ तसेच उपरोक्त मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगे शासन स्तरावर दि. ०१/११/२०१३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरच्या बैठकित, मा. उच्च न्यायालयाने दि. २५/१०/२०१३ रोजी पोलीस पथक व पोलीस स्थानक स्थापने बाबत, मिरा भाईंदर महानगरपालिकेस सदर आदेशाच्या आठ आठवड्यात प्रस्ताव शासनास सादर करणे करीता शासनाचे प्रारुप ठरावाच्या मसुद्यानुसार कार्यवाही करणे अपेक्षीत असल्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

तरी नागरी पोलीस ठाणे व निर्माण करावयाच्या यंत्रणेसाठी शासनाने विहित केलेल्या प्रारुप मसुद्यानुसार ठरावाद्वारे मान्यता देणे कामी प्रस्ताव मा. महासभेस फेर सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१९/११/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (५५) - महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव करणे व आर्थिक खर्चासाठी प्रशासकीय मंजूरी देणे.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये एकूण ३८६ आरक्षणे विविध प्रयोजनाकरिता दर्शविण्यात आलेली आहेत. सदर आरक्षणापैकी शासकीय जागेवर दर्शविण्यात आलेल्या आरक्षणांची संख्या २८ आहेत. सदर पैकी हस्तांतरीत झालेल्या आरक्षणांची संख्या २७ आहेत. यापैकी मिरा भाईंदर महानगरपालिका समूचित प्राधिकरण असलेल्या आरक्षणाखालील जागा २१ आहेत व इतर संस्थांनी विकसीत करावयाच्या आरक्षणांची संख्या ७ आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना आरक्षणाखाली असलेल्या शासकीय जागा अतिक्रमणापासून संरक्षण होणेकरिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०३/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकूण ०८ जागा व क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०४/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकूण १७ जागा अशा एकूण २५ जागांचा महानगरपालिकेस आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहुन आगाऊ ताबा देण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस आरक्षणा व्यतिरिक्त विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी शासकीय जागेची आवश्यकता असते. आरक्षणा व्यतिरिक्त इतर शासकीय जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेतल्यानंतर सार्वजनिक सोईसुविधा / प्रयोजनासाठी वापर करता येवू शकतो, म्हणून प्रथमतः अशा शासकीय जागा हस्तांतरीत करुन घेण्यासाठी शासनास / विविध प्राधिकरणास प्रस्ताव सादर करणे, तसेच पाठपुरावा करुन जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे. म्हणून महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव तयार करणे, सादर करणे व पाठपुरावा करुन हस्तांतरीत करुन घेण्यासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

तसेच उक्त शासकीय जागा संपादनासाठी होणा-या खर्चास ही आर्थिक व प्रशासकीय मंजूरीचे अधिकार आयुक्त याना देणे आवश्यक आहे. सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात रु.५० लाख तरतूद करण्यात आली आहे. शासकीय जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेणेसाठी करावयाच्या कार्यवाहीचे सर्व अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देणेबाबत निर्णय होणेसाठी मा. महासभेस प्रस्ताव निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

शासन निर्णय क्र. राफेधो-२०१३/प्र.क्र. ३९/नवि-३४

दि. २१ ऑक्टोबर २०१३

**पहा** — १) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. योगमस्रो-२००६/प्र.क्र. १०९/नवि-२४, दि. १७ जून, २००६

२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक राफेधो- ०३०९/प्र.क्र २०/नवि-३४, दि. ०२ मार्च, २००९.

३) मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०९ सप्टेंबर, २०१३ चे आदेश.

***प्रस्तावना*** : केंद्र शासनाच्या नगर विकास व दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाने सन २००४ साली नागरी क्षेत्रातील रस्त्यावरील किरकोळ विक्रेत्याबाबत **"राष्ट्रीय फेरीवाला धोरण"** जाहीर केले होते. सदरहू फेरीवाला धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी व याबाबत शासनास सल्ला देण्यासाठी शासनाने प्रधान सचिव (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये एक राज्यस्तरीय समिती गठीत केली होती. सदरहू समितीने राज्यात **राष्ट्रीय फेरीवाला धोरण** लागू करण्याच्या दृष्टीने राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका अधिनियमात तसेच मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यामध्ये आवश्यक सुधारणांचा मसुदा व फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमन करण्यासाठी आदर्श उपविधी तयार करून शासनास सादर केले. शासनाने काही सुधारणांसह या उपविधीस मान्यता दिली आहे.

शासनाने संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमन करण्यासाठी आदर्श उपविधीच्या धर्तीवर स्थानिक परिस्थितीनुसार उचित फेरफार करून उपविधी तयार करून शासनाच्या पूर्व मान्यतेने आपआपल्या क्षेत्रात लागू करण्याचे आदेश निर्गमीत केले आहेत.

आता मा. सर्वोच्च न्यायालयाने **"महाराष्ट्र एकता हॉकर्स"** संघटना विरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विविध अपिल प्रकरणामध्ये (सिव्हिल अपिल क्रमांक ४१५६-४१५७/२००२, सिव्हील अपिल क्र. ४१६१-४१६२/२००२, सिव्हील अपिल क्र. ४१७५-४१७६/२००२ सिव्हील अपिल क्र. व इतर) दि. ०९ सप्टेंबर, २०१३ रोजी असे आदेश दिले आहेत की, केंद्र शासनाचे

नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही सर्व राज्य शासनांनी त्वरीत करावी.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०९ सप्टेंबर, २०१३ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन **शासन निर्णय नगर विकास** विभाग क्र. **राफेधो-०३०९/प्र.क्र. २०/ नवि-३४. दि. ०२ मार्च, २००९** व यापूर्वी यासंदर्भात देण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमीत करून केंद्र शासनाच्या **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** ची राज्यात अंमलबजावणी करण्याकरीता राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांना निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## *शासन निर्णय-:*

मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०९ सप्टेंबर, २०१३ चे आदेश विचारात घेऊन राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांना पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत -----

१. **राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांनी राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सदर **राष्ट्रीय फेरीवाला धोरण** मधील **परिच्छेद क्र. ४.५.१** मधील तरतूदीनुसार आपल्या क्षेत्रात महानगरपालिका/नगरपालिका शहर फेरीवाला समिती स्थापन करावी तसेच ज्या शहराचे/नगराचे महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्र मोठे असेल अशा मोठ्या क्षेत्राकरीता १ पेक्षा जास्त फेरीवाला समिती गठीत करता येईल. सदर समितीवर प्रवर्ग १ मधील शासनाने नियुक्त करावयाच्या सदस्यांची यादी सोबतच्या विवरण पत्रात दिली आहे.
२. प्रत्येक शहर फेरीवाला समिती ही विविध संघटनांच्या प्रतिनिधींची व फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधींची मिळून बनलेली असेल ज्यामध्ये नियुक्त करावयाच्या फेरीवाला संघटनांच्या प्रतिनिधींपैकी **३०% महिला** असतील.
३. सदर समितीवरील विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच फेरीवाला यांच्या प्रतिनिधींची निवड ही शहर फेरीवाला समितीद्वारे निःपक्ष व पारदर्शी तंत्राद्वारे करण्यात येईल.
४. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ०२ महिन्याच्या विहीत कालावधीमध्ये फेरीवाला समिती स्थापन करण्याची कार्यवाही संबंधित महानगरपालिकेने/नगरपालिकेने पूर्ण करावी.
५. शहर फेरीवाला समितीने आपले कामकाज **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील तरतूदीनुसार काटेकोरपणे पार पाडावे तसेच घेण्यात आलेले निर्णय पुढील एक आठवड्याच्या कालावधीत प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीया द्वारे प्रसिद्ध करावेत.
६. शहर फेरीवाला समितीस या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मदतीने महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्राचे फेरीवाला क्षेत्र उपक्षेत्रामध्ये विभागणी करता येईल तसेच **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील **परिच्छेद क्र. ४.२ (B) आणि (C)** नुसार फेरीवाला क्षेत्राची विभागणी करण्याबाबत कार्यवाही करावी.
७. **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील **परिच्छेद क्र ४.५.४** मधील तरतूदीनुसार सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण करावे. नोंदणीकरणानंतर फेरीवाल्यास शहर फेरीवाला समिती विहीत करेल अशा क्षेत्रामध्ये काम करण्याचे अधिकार प्राप्त होतील.

८. सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ०८ आठवड्यांच्या कालावधीमध्ये सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण करण्याची कार्यवाही महानगरपालिका / नगरपालिका यांनी पूर्ण करावी.

९. महानगरपालिका / नगरपालिकांनी व स्थानिक प्राधिकरणांनी **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत.

१०. शहर फेरीवाला समितीची बैठक प्रत्येक महिन्यात घेण्यात यावी. परंतु आवश्यकतेनुसार अध्यक्षांना तातडीची बैठक बोलाविता येईल तसेच सदर समितीने **राष्ट्रीय फेरीवाला धोरण** २००९ मधील तरतुदींची अंमलबजावणी (विशेषत्वाने पॅराग्राफ क्र. ४.५.२ (बी) आणि (सी)) होईल याची खातरजमा करावी.

११. **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** व फेरीवाल्या संदर्भातील महानगरपालिका / नगरपालिका नियमात काही वाद निर्माण झाल्यास **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील तरतुदी लागू राहतील.

१२. **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील तरतुदीनुसार सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण व फेरीवाला क्षेत्र निर्माण करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रामध्ये सद्य:स्थितीत कार्यरत असणाऱ्या फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास अनुमती द्यावी. वरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर फेरीवाल्यांना केवळ संबंधित शहर फेरीवाला समितीच्या आदेश/निर्देशानुसार फेरीवाल्यांना व्यवसाय करता येईल.

१३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९ सप्टेंबर, २०१३ च्या आदेशाची अंमलबजावणी विहीत मुदतीमध्ये महानगरपालिका / नगरपालिकांनी **तात्काळ** करावी.

१४. महापालिका आयुक्तांनी एका उप आयुक्तांची व मुख्य अधिकाऱ्यांनी एका अधिनस्थ अधिकाऱ्यांची निमंत्रक ( Convener) म्हणून नियुक्ती करावी.

सदरहू आदेशांची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(गो. आ. लोखंडे)
उप सचिव (नगर विकास विभाग)

प्रत,

१. आयुक्त, सर्व महानगरपालिका
२. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
३. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका
४. निवडनस्ती नवि-३४

My Computer/H/S-2/HWK VIP/HWK-GR 2013

# शासन निर्णय क्र. राफेधो-२०१३/प्र.क्र. ३९/नवि-३४ चे विवरण पत्र

राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ मधील परिच्छेद ४.५.१ मध्ये शहर फेरीवाला समितीची रचना विहीत केली आहे. त्यानुसार सदर समितीवर एकूण चार प्रकारच्या विविध प्रवर्गातील प्रतिनिधींची सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. सदर समितीवर नियुक्त करावयाच्या विविध प्रवर्गातील सदस्य व त्यांची संख्या पुढीलप्रमाणे विहीत केली आहे---

## शहर फेरीवाला समिती

| अ.क्र. | सदस्यांचा प्रकार (प्रवर्ग) | सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | स्थानिक प्राधिकरण, नियोजन प्राधिकरण, पोलीस व इतर अशा प्रवर्गाचे प्रतिनिधी | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०% इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |
| २. | फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान ४०% इतके सदस्य फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी असतील. |
| ३. | रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन्स, समुदाय आधारीत संघटना (कम्युनिटी बेस ऑरगनायजेशन्स) | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०% इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |
| ४. | इतर नागरी (सिव्हील) संस्था संघटना, जशा NGO, व्यवसायिक समुहातील प्रतिनिधी (जसे वकील, डॉक्टर, नगर रचनाकार, आर्किटेक्ट इत्यादी) व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी, शेडयुल बँकांचे प्रतिनिधी व महत्वाचे नागरीक (eminent citizens) | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०% इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |

शहर फेरीवला समितीवरील नियुक्त करावयाच्या फेरीवाला संघटना, रेसिडेन्ट वेलफअर असोसिएशन व इतर नागरी संस्था संघटना या प्रवर्गातील एकूण सदस्यांच्या संख्येपैकी किमान १/३ सदस्य या महिला असल्या पाहिजेत.

**राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मध्ये परिच्छेद ४. ५. १ शहर फेरीवाला समितीची रचना विहीत केली असून त्यानुसार विविध चार प्रवर्गातील प्रतिनिधींची सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. वर नमूद तक्त्यातील प्रवर्ग २ मधील फेरीवाला संघटनांच्या प्रतिनिधींची संख्या ही फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान ४०% इतकी असली पाहिजे व उर्वरीत ३ प्रवर्गातील प्रतिनिधींची संख्या ही प्रत्येकी २०% या समप्रमाणात असली पाहिजे.

## महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समिती

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | प्रभाग अधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांनी निर्देशित केलेले वरिष्ठ अधिकारी - उप आयुक्त/सहायक आयुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेले. |
| २. सदस्य | : | कार्यकारी अभियंता, नगररचना विभाग |
| ३. सदस्य | : | मुख्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका यांचे प्रतिनिधी |
| ४. सदस्य | : | पोलीस आयुक्त, यांनी नियुक्त केलेले सहायक पोलीस आयुक्त |
| ५. सदस्य | | पोलीस निरीक्षक (वाहतूक). |

## नगरपालिका शहर फेरीवाला समिती

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | मुख्याधिकारी, नगरपरिषद |
| २. सदस्य | : | नगररचनाकार |
| ३. सदस्य | : | वैद्यकीय अधिकारी (ग्रामीण किंवा कॉटेज हॉस्पिटल) |
| ४. सदस्य | | वरिष्ठ पोलीस निरीक्षक |
| ५. सदस्य | | पोलीस निरीक्षक (वाहतूक) |

महानगरपालिका आयुक्त/मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०९ सप्टेंबर, २०१३ चे आदेश विचारात घेवून **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील **परिच्छेद ४.५.१** मध्ये विहीत केल्यानुसार शहर फेरीवाला समितीवरील उर्वरीत प्रवर्गातील सदस्यांची नियुक्ती करावी.

आयुक्त, मुंबई महानगरपालिका तसेच उर्वरीत ब,क व ड वर्ग महानगरपालिका आयुक्त यांना केंद्र शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकरण जसे- रेल्वे, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या प्रतिनिधींचा विशेष निमंत्रित म्हणून समितीवर नियुक्ती करता येईल तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचे रस्ते असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींची सदस्य निमंत्रित म्हणून समितीवर नियुक्ती करता येईल.

*****************************************************************************

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १३/११/२०१३.

## मा. महासभा दि. १९/११/२०१३
## पुरक घोषणा

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १९/११/२०१३ रोजी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ५६ | सन्मा. सदस्या डॉ. नयना मनोज वसाणी यांचा दिनांक १३/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------------<br>विना परवानगी लावण्यात आलेले बोर्ड, बॅनर्स, कटआऊट कमानमुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान व नागरीकांना होणाऱ्या गैरसोयी बाबत. |

(हरेश ल. पाटील)
महापालिका नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# डॉ. नयना मनोज वसाणी

**नगरसेविका**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,

स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),

ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

संपर्क : तन्वी क्लिनिक, फ्लॅट-००४, बिल्डींग बी-२४, अष्टविनायक, सेक्टर-७, शांति नगर, मिरारोड (पू), ता. जि. ठाणे-४०१ १०७.

दूरध्वनी : २८१२०१०१ / २८१००१०१. मोबाईल : 9833199995 Email : nayana.vasani@yahoo.com.


जावक क्र. ________ प्रकरण क्र. ५६ करिता

दिनांक : १३.११.२०१३

प्रति,

मा. सचिव सो.

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- दि. १९/११/२०१३ रोजीच्या महासभेत "ज" प्रस्ताव घेणे बाबत.

मनपा/आस्था/५९७/२०११-१२ दि.०२/०५/२०११ मा.आयुक्त ह्यांचे आदेश व मा जिल्हा न्यायालय ठाणे ह्यांचेकडील दावा क्र. आर सी एस ४३४/१९८ दि.२१/१२/२००५ रोजीचे आदेश विना परवानगी लावण्यात आलेले बोर्ड, बॅनर्स, कटआऊट कमानमुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान व नागरिकांना होणाऱ्या गैरसोयी बाबत

महोदय,

वरील आदेशानुसार जाहिरात विभागने तसेच क्षेत्रिय अधिकारी ह्यांनी मिरा भाईंदर क्षेत्रातील मुख्य रस्ते व इतर रस्त्यांवरील दुभाजकांमध्ये बोर्ड, बॅनर्स, कटआऊट, कमानी करिता प्रथम पोलिस विभागातील वाहतुक शाखा ह्यांच्याकडुन परवानगी प्राप्त झाल्यानंतरच तसेच ट्राफिक सिग्नल व ट्राफिक आयलॅड भागात बोर्ड, बॅनर्स करिता परवानगी देऊ नये असे आदेश असताना आज शहरामध्ये बेकायदेशीरपणे बोर्ड, होर्डिंग कमानी कटआऊट उभारले जातात. अशाप्रकारे परवानगी न घेता लावलेले बोर्ड, बॅनर्स, कमानी नेमलेल्या कर्मचाऱ्यामार्फत व पोलिसांच्या सहकार्याने तत्काळ काढुन टाकण्यांत यावे. तसेच संबंधितावर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ नुसार कारवाई प्रस्तावित करावी असे आदेश मा. आयुक्त ह्यांनी सर्व प्रभाग अधिकारी, उपायुक्त ह्यांनी वरील नमुद केलेल्या आदेशाने कळविले आहे. तसेच मा न्यायालय यांनी आपले आदेश क्र वरील नमुद केल्याप्रमाणे विधी विभागाने कार्यकारी अभियंता सार्व बांधकाम विभाग व संबंधित अधिकाऱ्यांना दि. मनपा/विधी/२३७०/२००८-९ पत्रान्वये कळविले आहे.

असे सर्व आदेश असताना शहारामध्ये मुख्यत: लोकप्रतिनिधी, खासदार, आमदार व सन्माननीय सभासद व मा. महापालिकेचे पदाधिकारी यांचेकडुन वरील आदेशाची अवहेलना होत असुन महापालिकेच्या ठरावाप्रमाणे ठरविलेल्या दरसुचिप्रमाणे पैसे ही न भरल्याने महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे व नागरिकांनाही त्यांचा त्रास होऊन रहदारीमध्ये गैरसोय निर्माण होत आहे.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

# [illegible]

**[illegible]**

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]　　　　[illegible]

# डॉ. नयना मनोज वसाणी
**नगरसेविका**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय,**
**स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),**
**ता. जि. ठाणे - ४०१ १०१.**

संपर्क : तन्वी क्लिनिक, फ्लॅट-००४, बिल्डींग बी-२४, अष्टविनायक, सेक्टर-७, शांति नगर, मिरारोड (पू), ता. जि. ठाणे-४०१ १०७.
दूरध्वनी : २८१२०१०१ / २८१००१०१. मोबाईल : 9833199995 Email : nayana.vasani@yahoo.com.

जावक क्र ______________ दिनांक : १२.११.२०१३

एखाद्या सामान्य नागरिकांने किंवा दुकानदाराने महापालिकेच्या फुटपाथ किंवा रस्त्यावर सामान तात्पुरता ही ठेवले असता आपण त्याच्यावर त्वरीत कारवाई करून ताबडतोब ते काढुन नष्ट करून लावतो व त्यांच्यावर दंड आकारला जातो. तर हे तेवढेच लोकप्रतिनिधी वर ही सारखेच लागु का न व्हावे ? या महापालिकेच्या सभागृहामध्ये बॅनर्स, पोस्टर, कटआऊट अधिवर बंदी घालण्याचे प्रस्ताव कित्येक वेळा घालण्यांत आले होते पण त्याच्यावर निर्णय झाले नाही.

यापुर्वी महापालिकेमध्ये ४ प्रभाग समित्या होत्या ज्या आता ६ झाले आहेत. क्षेत्रिय अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र ही कमी झाल्याने कामाचा दबाव तेवढा नसताना कारवाई का होत नाही ? याचे उत्तर मा. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्याकडुन त्वरीत लेखी स्वरुपाने मागवुन घ्यावे या "ज" प्रस्तावाच्या माध्यमाने मागील वर्षामध्ये २०१२ ते आजपर्यंत जे काही बेकायदेशीर बॅनर लागले असतील त्यांना नोटीस बजावुन प्रशासनाचे आर्थिक नुकसान भरपाई करून घेणे व न केल्यास जबाबदार अधिकाऱ्यावर कडक कारवाई करावी असा प्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- Vasani
डॉ. नयना वसाणी

अनुमोदन :-
A. S. Kasodariya